VOL. 5 | ISSUE 5| SEPTEMBER - OCTOBER 2019

Impact Factor: 4.197 (IIJIF)

ISSN: 2454-5503

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES (CHCS)

A BIMONTHLY REFEREED INTERNATIONAL JOURNAL

*Chief Editor :*

**Dr Kalyan Gangarde,**

Director, Centre for Humanities and Cultural Studies, Kalyan (W)

*Executive Editor*

**Dr Grishma Khobragade,**

Asst. Prof., Birla College, Kalyan (W)

*Co- editors*

**Dr. Sadhana Agrawal,**

Asst. Professor, Maharani Laxmibai Govt. College of Excellence, Gwalior (M.P.) India

**Pandurang Barkale,**

Asst. Professor, Dept of English, SNDT Women's University, Churchgate, Mumbai

**Bharat Gugane,**

Asst. Professor, Bhosala Military College, Nashik, Maharashtra

**Dr. Dashrath Kamble,**

Asst. Professor, S.B.College, Shahapur, Dist. Thane, Maharashtra

**Dr. Sachin Bhumbe,**

Asst. Professor, P. N. Doshi College, Ghatkopar, Mumbai

*Mahatma Gandhi Education and Welfare Society's*

## CENTRE FOR HUMANITIES AND CULTURAL STUDIES, KALYAN (W)

*www.mgsociety.in +91 8329000732 Email: chcskalyan@gmail.com*

Principal
Late.Sow.Sheshabai
Sitaram Mundhe Art's Coll
Gangakhed Dist.Parbha

ISSN: 2454-5503
Impact Factor: 4.197 (IIJIF)

# CONTENTS

From the Editor's Desk......... | 4

1. १९७० या दशकातील दलित स्वकथनाचे स्वरुप
**प्रा.डॉ.सुरेश व्यंकटराव कदम** 5
2. गीताजंली मधील ईश्वरनिष्ठा
**प्रा. डॉ. प्रवीण कारंजकर** 12
3. भारतातील स्त्री-पुरुष प्रमाण : एक दृष्टिक्षेप
**प्रा.डॉ.दिगंबर भ. रोडे** 16
4. सहकारी खरेदी - विक्री संस्थाची आवश्यकता व कार्य
**प्रा.डॉ. तुळशीराम ज्या-नीराम सिराळ** 21
5. शोध गौतम बुद्धाच्या वंशावळीचा
**प्रा. संतोष द. कदम, प्रा. डॉ. विलास पाटील** 28
6. जातीअंताच्या लढ्यातील स्त्रियांची भूमिका
**प्रा. सुरेश वा. पारवे, प्रा. विलास पाटील** 30
7. Museums And The Conservation Of Historical Sources
**Dr. Sutawane Parimal Arvind** 33
8. India's Cultural Vision in Upamanyu Chatterjee's English, *August: An Indian Story*
**Mr. M. Daraniselvan & Prof. M. Amalraj** 35
9. Patriarchal Society as Delineated in *Difficult Daughters* by Manju Kapur
**Mrs. R. Vaitheswari & Mrs.Visalachi** 39
10. Feminist Existentialism in Githa Hariharan's *Thousand Faces of Night*
**Mrs. E. Padmalakshmi & Prof. M. Amalraj** 43
11. Feminist Perspectives in Sisiter of My Heart
**Ms. N Neelakalpana & Mrs. Visalachi** 51
12. Dr. B.R. Ambedkar's thoughts on Caste System and Democracy in India
**Dr. Rajiv N. Aherkar** 54

ISSN: 2454-5503
Impact Factor: 4.197 (IIJIF)

12.

# DR. B.R. AMBEDKAR'S THOUGHTS ON CASTE SYSTEM AND DEMOCRACY IN INDIA

**Dr. Rajiv N. Aherkar**
Assistant Professor,
Department of English,
Late Sow. S.S.M. Arts College, Gangakhed Dist. Parbhani.

**Abstract:** The present paper is an attempt to study Dr. B. R. Ambedkar's thoughts on caste and Indian democracy. Indian culture is based on multi-religion and multi-caste and multi-race. Religion, caste and race are inter-related which influence on Indian culture. Culture is an integral part of social system. Indian social system is based on the caste system. The caste in India plays a vital role in every aspects of society. It is seen that caste factor is dominant in Indian Society. It is also seen that in ancient time, Indian society was ruled by the laws of the *Manusruti*. The *Manusmruti* is based on *Chaturvarnya* (four sections of the society i.e. *Brahmin, Kshatriya, Vaisha and Shudra*). *The Shudras* were being treated as subhuman and were deprived from all rights of a human being. The Indian social reformers like Dr B.R. Ambedkar sacrificed their lives to eradicate caste system from Indian society. The British Raj also tried to destroy caste system from India. Dr. Ambedkar burned the *Manusmruti* and fought for equal treatment to *the Shudra* in the Indian society. Dr. Ambedkar studied hard to write Indian Constitution based of the principles of *Liberty, Fraternity, and Equality* to form secular society. The heart of Indian Democracy is Indian Constitution but the caste system is a big challenge to democracy in India. The present paper is an attempt to study how the caste system is a big challenge to democracy in India in the light of Dr. B. R. Ambedkar's thoughts.

**Key words**: Indian Society, *Chaturvarnya*, Democracy, Caste system, Secular society.

**Introduction:**

Indian culture is one of the ancient cultures in the world. The scholars from the different land came to India because of the rich heritage of India. In ancient time India was the center of attraction. Besides the richness of Ancient India culture and heritage, there was some systems which was affecting the rich tradition of India and the Caste System was one of them. As caste is the integral part of Indian social system, it affects the every level of the Indian society. From the *Manusmruti* to the *Indian Constitution*, it is seen the caste plays an important role. Manu, the law maker of the the *Manusmruti*, founded the society on the basis of *Chaturvarna* and Dr. B. R. Ambedkar, one of the makers of the *Indian Constitution*, founded the society on the principles of *Secularism* and *Social Democracy*. Dr. Ambedkar was the victim of caste system and Untouchability in Indian society. He realized that these two hurdles must be eradicated from the society to form a secular and social democracy. He committed his life to eradicate the caste and dreamed a secular society.

In 1891, Dr. Bhimrao Ramaji Ambedkar popularly known as Babasaheb was born into an Untouchable caste, known as *Mahar*- an *inferior village servants*. The inferior village servants were being treated as *sub-human* because of the inferiority and lowest caste level in the society. Dr. Ambedkar experienced *discrimination* and *marginalization* from his early childhood. He

ISSN: 2454-5503
Impact Factor: 4.197 (IIJIF)

was not allowed in school and deprived from all the rights which were for the people of the upper caste, *Savarna*. Even in such condition, Bhimrao's father, Ramaji Ambedkar became a *Subhedar* in Indian British Army. Ramaji insisted for schooling of his son and Bhimrao was allowed to attend school on certain conditions. Despite of discrimination in school. Ambedkar was the first from his community to become a graduate. He started his non-stop journey in the oceanic field of education in search of knowledge. He was helped by social reformers like Sayajirao Gaikwad, the Maharajah of princely state of Baroda. The Maharajah was an active advocate of social reforms, including the removal of untouchability. He sponsored Ambedkar's further education abroad, first at Columbia University in New York where he completed Master Degree and Ph.D. During this period, Ambedkar studied economics, history and political science, and wrote on a wide range of topics, including the history of caste in India.

Dr. Babasaheb returned to India in 1924 and intensified his campaign of social reform by establishing the *Bahishkrit Hitakarni Sobha* (Group for the Wellbeing of the Excluded) to promote socio-political awareness among the *Dalits* and raise public awareness of their grievances. He believes in the principles of *Liberty, Fraternity* and *Equality*. Democracy for Dr. Ambedkar is empowerment of any person for participating in the process of decision-making relating to her/him. Through the process of constitution making, Dr. Ambedkar has the tone to empower the common man. When one study the life book of Dr. Ambedkar, the reader will find that Dr. Ambedkar is *a symbol of revolt*, the liberating force of the Untouchables and one of the front-ranking nation-builders of modern India and the chief architect of the Indian Constitution which is based on social democracy.

**Ambedkar's Thoughts on Democracy:**

12th century great saint Dnyaneshwara was also of the opinion and considered the world is a home (*Vishwachi majhe ghara*) and every member of the home should have the freedom to live his/her life with dignity. Like saint Dnyaneshwara, Dr. B. R. Ambedkar has also belief in the freedom and dignity of the common man. He fought throughout his life for the dignity of the *Dalit* as well as victims of caste system and tried to establish social democracy in India. Being a victim of caste system and untouchability, Dr. Ambedkar advocates that education is the liberating force and he becomes an extra-ordinary learnt scholar of the world. Only after completed his education and experiencing the western social life, he started to liberate the down-trodden people of Indian society in a democratic way without shedding a single drop of blood. Dr. Ambedkar was highly inspired by the human efforts of social reformers like Shahu Maharaj and Mahatma Jotiba Phule.

When one tries to find the origin of the word Democracy, s/he will find that the term democracy is derived from the Greek words 'demos' and 'Kartos', the former meaning the people and the later power.[01]. According to R.K. Kshirsagar, democracy is a form of Government in which the people rule themselves either directly or indirectly. In democracy, the base of sovereignty is common people. According to J.R. Lewis, "Democracy is basically as a form of Government, but a form which exists to supply and maintain a better society and to provide the maximum amount of liberty for individual consistent with the attainment of order and security within the State".[02]

It is very necessary to know the vision of Dr. Ambedkar about democracy. According to Ambedkar, democracy means fundamental changes in the social and economic life of the people and the acceptance of those changes by the people without resorting to disputes and bloodshed. He wanted to establish the principle of one man, one vote and one value not only in the political life of India but also in social and economic life. He wanted political democracy to be accompanied by social democracy. Dr. Ambedkar paid serious attention to religious notions that promote democracy. Ambedkar viewed the religious foundation of caste as the

fundamental obstacle to democracy in India on the one hand and the Buddhist doctrine of liberally, equality and fraternity as the foundations for democracy on the other hand. The names, *Brahmin, Kshatriya, Vaisha and Shudra* are hierarchical divisions of high and low caste, based on birth and act accordingly". In India, life was the monopoly of the *Brahmin* caste and was completely denied to other castes for thousands of years.

The most popular definition of Democracy is given by Abraham Lincoln as, "Democracy as Government of the people by the people and for the people."[03] Many thinkers have given many definition's and meaning of democracy. But the fact is Democracy is not merely a form of Government but it is a way of life. Which is based on radical humanism? Dr. Babasaheb Ambedkar gave snuggle and channelized his all efforts to realize Democracy in India. Dr. Ambedkar revolted against *Chaturvarnya*, Caste and Untouchability system to establish democracy in India.

Dr. Ambedkar defines democracy as "a form and a method of Government whereby revolutionary changes in the economic and social life of the people are brought about without bloodshed".[04] Dr. Ambedkar further defined Democracy as, "democracy is a mode of associated living. The roots of Democracy are to be searched in social relationship, in terms of associated life between the people who form the society.[05]

**Caste System: A Challenge to Democracy:**

The entire Indian society is divided in caste system which is based on negation of human values and glared inequalities in society. Dr. Ambedkar explained the evil effects of caste system as "Caste has killed public spirit. Caste system has destroyed the sense of public charity. The Caste has made public opinion impossible. A Hindu's public is his caste. His responsibility is only to his caste. His loyalty is restricted only to his caste. Virtue has become caste-ridden and morality has become caste bound. There is no sympathy to the deserving. There is no charity to the needy."[6]

In his essay, *Prospects of Democracy in India*, Dr. Ambedkar tries to give the true meaning of democracy. Through the essay, he shades light on the problem with the Indian Democracy due to the caste system and tries to examine the problems that arise due to the caste system and explains why the caste system is a threat to the democracy in India. Indian social system is based on caste system and everything is organized on the basis of caste. An Indian cannot marry or eat with an Indian simply because of caste. Inter-caste marriage is not allowed in Indian society. Caste has influence on elections also. In democracy it is very important to elect the representative of people. In Indian election, people elect their representative by casting vote to the candidate belonging to their caste. They don't consider his/her ability. The caste of the candidate is his/her ability. The political party also considers the caste of the candidate and the number of voters belonging to his/her constituency and then finalize his/her candidature for the election. In the field of industry, caste has very vital role. The industrialists give the topmost positions to the persons who belong to the caste of the industrialists. Same is the position in the field of charity, commerce and education[6].

There are some special features of caste system which have their evil effects and which work against democracy in India. Dr. Ambedkar emphasizes on one of the features of the Caste System which lies in its being accompanied by what is called *Graded Inequality*. In India Castes are not equal in their status. The castes are lover and higher. They are jealous of one another. It destroys willing and helpful co-operation, unity, loyalty and sympathy which is the foundation of society. In India caste system makes complete isolation of an individual. One caste is bound to one occupation and it is assumed that the individual should follow the occupation of his/her caste instead to prove his ability in other business. A society should be

ISSN: 2454-5503
Impact Factor: 4.197 (IIJIF)

democratic allowing freedom to its member to do the business according to his/her ability not on the caste base. The caste system in Indian society restricts the individuals to use their freedom of choice. The freedom of choice is one of the qualities of democracy. The caste system in India has affected every aspects of society and a big challenge to democracy in India. To remove the caste from Indian society, Dr. Ambedkar suggests that education may be solvent if it is applied to the lower strata of the Indian Society because it would raise their spirit of rebellion. In ignorance, they supports the caste system but once their eyes open by education, they will be ready to fight the caste system[7].

**Conclusion:**

Dr. Ambedkar says to preserve Indian democracy, it is very necessary to remove contradiction. Contradiction is that where one finds inequality in social and economic life but equality in politics in the name of one man one vote. Ambedkar believes that, castes are anti-national and anti- social because it creates jealousy and differences among the individuals. Caste marginalizes and discriminates the individuals who belongs to the lower castes. Caste is a big obstacle in the unity of Indian Society as well as a big challenge to the democracy in India. Once caste system dissolved, it would be a great help to establish social democracy in India.

**Reference:**

1. Kshirsagar Ramchandra Kamaji, *Political Thought of Dr. Babasaheb Ambedkar*, Intellectual publishing house, New Delhi, 1992, p.53.
2. Lewis, I.R., *Democracy the Theory and Practice*, Allman and Sons, London, 1966, p.14.
3. *Jatava D.R. Political Philosophy of B.R. Ambedkar*, National publishing House, New Delhi, 2001, p.77.
4. Ibid, p.54.
5. Shashi S.S. (Dr.) (Editor), *Ambedkar and social justice, volume I, Director, Publications Division, Ministry of Information and Broadcasting*, Government of India, New India, 1992, p.162.
6. Dr. B. R. Ambedkar, 1956, *Prospects of Democracy in India*, in Lights and Delights: An Anthology of English Prose, Poetry and Functional Grammar, Ajay R. Tense (Ed.) and Others, Orient Black Swan, 2014, p.36.
7. Ibid, p. 37-39.

❑❑❑

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

# Vidyawarta®

Peer Reviewed International Refereed Research Journal

Issue-31, Vol-04 July to Sept. 2019

Principal
Late.Sow. Sheshabai
Sitaram Mundhe Art's College
Gangakhed Dist.Parbhani

Editor
Dr.Bapu G.Gholap

27) राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान : उत्तर प्रदेष के तराई जिलों के विशेष सन्दर्भ में
डा० मीनू सिंह, रूपाली मिश्रा || 142

28) छायावाद: एक साहित्य प्रवाह
प्रा. डॉ. द्वारक गिते-मुंडे, बीड-महाराष्ट्र || 149

29) महाविद्यालयीन ग्रंथालयातील आवश्यक ई सेवा
डॉ. ढाकणे बालाजी निवृत्तीराव , शिंदे सिध्दार्थ बाबूराव || 152

30) भारत में गठबंधन की राजनीति : एक ऐतिहासिक विश्लेषण
Dr. Prem Kumar Nishad, Darbhaga. || 155

31) भारत पाकिस्तान युद्ध ७१, बांग्लादेश उदय, शिमला समझौता
Dr. Ruchi Mittal, Rudrapur || 161

32) छत्तीसगढ़ की प्रमुख महिला साहित्यकारों की रचनाओं में स्त्री विमर्श
मोनिका शर्मा, डॉ.रेशमा अंसारी, रायपुर (छ.ग.) || 165

33) सरकारी तथा गैर सरकारी माध्यमिक विद्यालयों में अध्ययनरत् विज्ञान वर्ग .......
डॉ०तब्बसुम,मेरठ || 169

34) गुप्त काल की सांस्कृतिक उपलब्धियाँ
डॉ०राजेश कुमार यादव, बाराबंकी, उ०प्र० || 171

35) नागार्जुन के उपन्यासों मैं राजनीतिक स्त्री चेतना
डॉ प्रकाश कुमार अग्रवाल, खड़गपुर कॉलेज || 173

36) बाल काहानियों में पर्यावरण चेतना
मंजू (शोधार्थी), हल्द्वानी || 174

37) स्मार्टफोन की शैक्षणिक उपयोगिता का विश्लेषणात्मक अध्ययन
डॉ.सौम्या नैयर, उपासना श्रीवास्तव, रायपुर || 177

38) सावित्रीबाई फुले —शिक्षणातील अग्रदूत
डॉ.श्री.निळकंठ रामचंद्र व्यापारी, ठाणे. || 179

39) वेब की दुनिया में हिंदी साहित्य
प्रा.डॉ.नितीन बा.कुंभार,बीड || 181

Principal
Late. Sow. Sheshabai
Sitaram Mundhe Art's College

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318

Vidyawarta®
Peer-Reviewed International Publication

July To Sept. 2019
Issue-31, Vol-04

0152

29

# महाविद्यालयीन ग्रंथालयातील आवश्यक ई सेवा

डॉ. ढाकणे बालाजी निवृत्तीराव
प्राचार्य
कै. सौ. शेषाबाई सीताराम मुंढे
कला महाविद्यालय, गंगाखेड,जि. परभणी.

शिंदे सिध्दार्थ बाबूराव
ग्रंथपाल
कै. सौ. शेषाबाई सीतारांम मुंढे
कला महाविद्यालय, गंगाखेड जि. परभणी.

**********

सार :—

प्रस्तुत लेखात महाविद्यालयीन ग्रंथालयातील आवश्यक ई सेवा याबाबत अभ्यास करण्यात आला आहे. ग्रंथालयामार्फत वाचकांना विविध प्रकारच्या सेवा दिल्या जात असतात. या सेवा देत असताना इंटरनेटची मदत घेवून जर सेवा देत आल्या तर ग्रंथपाल तसेच वाचक यांचा वेळ वाचेल. इंटरनेट मुळे माहितीचे जतन तसेच वहन करणे खुपच सोपे झाले आहे. इंटरनेटच्या मदतीने नविन माहिती मिळविणे व ती ठराविक वाचकापर्यंत ई सेवेच्या माध्यमातून पोचविणे सहज शक्य होत आहे.

कि वर्डस :— महाविद्यालयीन ग्रंथालय, ई सेवा

**प्रस्तावना :—**

भारतात जिओ कंपनीने इंटरनेट सेवा खुपच कमी किमतीत इ. स. २०१६ पासून सुरू केली आहे. तंत्रज्ञानातील प्रगतीमूळे स्वस्त स्मार्टफोन आणि इंटरनेट वापर करणाऱ्याची संख्या हि वेगाने वाढत आहे. ICUBE २०१८ च्या अहवालानुसार २०१९ हे वर्ष संपेपर्यंत भारतात इंटरनेट वापर करणाऱ्याची संख्या ही ६३ कोटी पर्यंत जाण्याचा अंदाज वर्तवलेला आहे. यात पण ग्रामीण भागातील इंटरनेट वापर करणाऱ्याची संख्या ही २९ कोटी पर्यंत असणार आहे. भारतातील ग्रामीण भागातील इंटरनेट वापर करणाऱ्याचे प्रमाण हे वार्षिक ३५% या वेगाने वाढत असल्याचे दिसून येते. सुरूवातीला इंटरनेट हे श्रीमंत व शहरी वर्गातील लोकासाठीच उपलब्ध होते पण ते आता ग्रामीण भागातील सर्वसामान्य माणसाच्या आवाक्यात आले आहे. इंटरनेट वापराचा हा वेग याच प्रमाणात राहिला तर २०१९ ला मोदी शासनाने जाहिर केल्याप्रमाणे २०२२ पर्यंत इंटरनेट सर्वासाठी उपलब्ध करण्यात येणार आहे.[१] आज सर्वच क्षेत्रात इंटरनेटचा वापर वाढला आहे. इंटरनेटच्या वापरामूळे कोणतेही काम हे खुपच जलद रितीने होत असल्याचे दिसून येते. शहरी तसेच ग्रामीण भागातील महाविद्यालयीन ग्रंथालयानी पण इंटरनेटची मदत घेवून ई सेवा प्रभावीपणे देण्यास सुरूवात केली आहे.

**महाविद्यालयीन ग्रंथालय :—**

अभ्यासक्रम पुर्ण करण्यासाठी विद्यार्थ्यांना सहाय करणे, व्याख्याने, प्रयोगशाळा अथवा इतर साधनाने जे ज्ञान विद्यार्थ्यांना प्राप्त होवू शकत नाही अशा पुरक ज्ञानाची सोय करणारी संस्था म्हणजेच महाविद्यालयीन ग्रंथालय होय.[२] एकंदरीत महाविद्यालयीन ग्रंथालयात क्रमिक पुस्तकाबरोबरच इतर वाचनसाहित्यात संदर्भ, विविध विषयाचे कोश व इतर प्रकारचे वाचनसाहित्य असते.

**ई सेवा :—**

इंटरनेटच्या मदतीने दिल्या जाणाऱ्या सेवेस ई सेवा असे संबोधले जाते. सद्यपरिस्थितीत सर्वच क्षेत्रात ई सेवेचा वापर होत असताना दिसून येते. महाविद्यालयीन ग्रंथालये पण या मार्गाचा अवलंब करून काळानुसार बदलत चालली आहेत. ई सेवा देण्यासाठी तंत्रज्ञानाची मदत घेवून ग्रंथालये आधुनिक बनत चालली आहेत.

**महाविद्यालयीन ग्रंथालयातील आवश्यक ई सेवा :—**महाविद्यालयीन ग्रंथालयातून प्रामूख्याने पुढील ई सेवा दिल्या जाव्यात.

१. **वेब ओपॅक** :— ग्रंथालयामध्ये संग्रहित ग्रंथाचे विविध प्रकारच्या आज्ञावलीमध्ये डेटा एंट्री करण्याचे

काम केले जाते. सदर ग्रंथ ओपॅकच्या माध्यमातून आपल्या ग्रंथालयात आहेत की नाही हे वाचकांना शोधता येते. गण त्यासाठी त्यांना ग्रंथालयात यावे लागते. पण ग्रंथालयानी स्वत:चा सग्रंह वेब ओपॅकच्या माध्यमातून इंटरनेट वर उपलब्ध करून दिल्यास वाचक आपल्या नोंदणीकृत नाव व पासवर्डच्या मदतीने आपल्याला हवा असलेला ग्रंथ ग्रंथालयात उपलब्ध आहे की नाही हे तो कार्यालयीन वेळेचे बंधन न पाळता कधीही पाहू शकेल. म्हणून वेब ओपॅक ही अंत्यत महत्वाची सेवा आहे.

२. बिब्लीओग्राफीक/कॅटलॉगीग डेटाबेस :— ग्रंथालयानी वाचकासाठी ई सेवेचा विचार करत असताना एखादा ग्रंथ जर मिळत नसल्यास त्या ग्रंथाशी संबधीत बिब्लीओग्राफीक/कॅटलॉगीग चे विवरण कसे उपलब्ध होतील यावर भर दिला पाहिजे. असे विवरण INFLIBNET च्या वेबसाईटवर IDCAT वर उपलब्ध आहेत. तसेच एखाद्या वाचकास ठराविक विषयाची माहिती पाहिजे असेल तर बिब्लीओग्राफीक/कॅटलॉगीग विवरण वाचकास पुरवावे.

३. डॉक्यूमेंट डिलीव्हरी सेवा (DDS) :— एखाद्या विषयाशी संबधीत माहिती ग्रंथालयात उपलब्ध नसेल तर दुसरीकडून माहिती उपलब्ध करून ती माहिती वाचकापर्यंत पोचविणे या सेवेचा वापर करून सहज शक्य होते. आपल्या देशात INFLIBNET हि संस्था नामांकीत मासीकातील लेख या सेवेमार्फत पाहोचविते. ग्रंथालयामार्फत ई सेवा देत असताना Google Scholar व DOAJ या माध्यमाचा वापर करून प्रभावी रितीने माहिती वाचकापर्यंत पोचविता येते.

४. ग्रंथ आरक्षण :— ग्रंथालयानी वाचकासाठी ग्रंथ आरक्षणाची सोय इंटरनेटच्या माधमातून उपलब्ध करून दिली पाहिजे. ग्रंथालयामध्ये उपलब्ध ग्रंथ स्वत:साठी आरक्षित करायचा असेल तर नोंदणीकश्त नाव व पासवर्डच्या मदतीने ग्रंथ आरक्षीत करून ठेवता आला पाहिजे.

५. न्युज ग्रुप :— यात एखादया विषयाशी संबधीत बातमी किंवा बातम्यावर आधारीत विविध तज्ञाचे लेख वाचण्यासाठी उपलब्ध असतात.[३] अशा विषयात आवड असणाऱ्या वाचकांना न्युज ग्रुप मध्ये सहभागी होण्यास प्रोत्साहन द्यावे.

६. ई—मेल अलर्ट :— वाचकाकडे ग्रंथ ठेवून घेण्याची मर्यादा जर ओलाडंली असेल तर सबंधीतास त्याबाबत ई मेल अलर्टच्या माध्यमातून जाणिव करून दिली पाहिजे. तसेच ग्रंथ देवघेवची माहिती देण्यासाठी पण ग्रंथालयानी ई—मेल अलर्ट हि सेवा वाचकासाठी दिली पाहिजे.

७. आर.एस.एस. फिड :— नविन आलेले ग्रंथ, मासिके याबाबतची ई—मेल अलर्ट ग्रंथालयामार्फत सर्व वाचकांना देण्यात यावा. त्यामूळे वाचकांना ग्रंथालयात नविन कोणते साहित्य आले आहे याची पुर्वसुचना मिळून प्रत्येक ग्रंथाला वाचक मिळाला पाहिजे या सिध्दातांची फलश्रुती होण्यास मदत होते.

८. न्युज लेटर :— ग्रंथालयानी स्वत:चे ग्रंथालयाचे न्युजलेटर तयार करून ते सर्व वाचकांपर्यंत ई मेल तसेच ग्रंथालय वेबसाईटच्या मदतीने पाहोचविले पाहिजे. ग्रंथालयातील विविध उपक्रमाची माहिती देण्यासाठी न्युज लेटर हे खुपच प्रभावी माध्यम आहे. यात नविन आलेल्या संदर्भ ग्रंथाची माहिती, ग्रंथालय घेत असलेल्या डेटाबेस कसा वापरावा याची माहिती दिली तर वाचकात रूची निर्माण होईल.

९. डेटाबेस ॲक्सेस :— ग्रंथालयानी घेतलेल्या डेटाबेस ॲक्सेसची सोय उपलब्ध करून दिली पाहिजे. egkfo|ky;k tkrh tkr iekkr NLIST चा डेटाबेस घेतला जातो. सदर डेटाबेसमध्ये मध्ये माहिती कशी शोधायची तसेच प्रत्येक वाचकास त्याचे नोंदणी नाव व पासवर्ड दिला जावा. ही सेवा जर उपलब्ध करून दिली तर वाचकास विश्वसनिय व उत्तम प्रतिचे साहित्य मिळण्यास मदत होते.

१०. ग्रंथालय वेबसाईट :— ग्रंथालयानी ग्रंथालयाची वेबसाईटवर आवश्यक ती माहिती द्यावी. ग्रंथालयाबाबत वाचकाला काही प्रश्न असल्यास त्याबाबत माहिती शोधण्यास त्याला मदत होते. ग्रंथालयाची स्थापना, कामकाजाचे तास, नियमावली

याबाबत माहिती मिळण्यास मदत होते. वेबओपॅकची लिंक त्यावर दिलेली असावी. ग्रंथालयाची वेबसाइट ही ग्रंथालयाचे प्रतिबिंबच आहे.

११. पोर्टल :— रॉवेल यांच्या मतानुसार पोर्टल हि एक अशी वेबसाईट आहे की ज्यामध्ये इंटरनेट माध्यम वापरून दर्जात्मक माहिती उपलब्ध करून दिली जाते.[४] ग्रंथालयानी पण असे पोर्टल बनवून ई सेवा देण्यावर भर दिला पाहिजे. यात विविध सेवाचे एकत्रीकरण करून वापरण्यासाठी सहज सोपे अशा प्रकारचे हे माध्यम आहे.

१२. सब्जेक्ट गेटवे :— ऑस्ट्रेलियन सब्जेक्ट गेटवे फोरमच्या मतानुसार सब्जेक्ट गेटवे ही एक इंटरनेट आधारीत नाविन्यपूर्ण प्रणाली असून ज्यात एका विषयातील निवडक व उच्च दर्जाची माहिती देणारे वर्णन व त्यासोबत माहिती शोधण्याची सोय असलेले साधन आहे.[५] या प्रकारात दोन भाग असल्याचे दिसून येते. पहिल्या भागात विषयाची सविस्तर माहिती तर दुसऱ्या भागात संबधीत लिंक्सची मांडणी केलेली दिसून येते. एखाद्या विषयातील सविस्तर अभ्यासासाठी याची खुपच मदत होते.

१३. व्हर्च्युअल टुर :— ग्रंथालयानी ग्रंथालयाचा व्हर्च्युअल टुरचा व्हिडीओ वेबसाईवर उपलब्ध करून द्यावा. जेणेकरून वाचकाला ग्रंथालयाची सर्व विभागाची माहिती कोठेही बसून बघता येईल. व्हर्च्युअल टुरमूळे ग्रंथालयातील कोणते कोणते विभाग कुठे आहेत तसेच त्या विभागाचे कार्य काय आहे समजण्यास मदत होईल.

14- Ask a Librarian:— ही एक प्रकारची शिघ्र संदभ्र सेवा आहे. वाचकाला जी माहिती जाणून घ्यायची आहे. ती माहिती त्याने ग्रंथालय वेबसाईट Ask a Librarian वर दिलेल्या लिंक जावून विचारणा करायची आहे. यामूळे माहितीचे जलद गतीने वहन होण्यास मदत होते. व वाचकाचा वेळ पण वाचतो.

१५. Instant Messaging :— ही इंटरनेटच्या माध्यमातून वापरात येत असलेली सेवा आहे. ग्रंथालय वेबसाईटवर याची लिंक देवून हिचा वापर केला जातो. किरकोळ स्वरूपातील माहिती शोधण्यासाठी या सेवेचा लाभ घेता येतो.

समारोप :— एकंदरीत वरील ई सेवाच्या माध्यमातून वाचकांना शिघ्र गतीने सेवा परीपूर्ण व तत्परतेने देता येतात. वाचक व ग्रंथालयीन कर्मचारी यांचा वेळ पण वाचतो. म्हणून ग्रंथालयानी ग्रंथालयामार्फत जास्तीत जास्त प्रमाणात ई सेवा देण्यावर भर दिला पाहिजे. ग्रंथालयानी कालौघात बदल करीत तंत्रज्ञानाचा स्विकार करीत ई सेवा दिल्या तर वाचकामार्फत जास्तीत जास्त प्रमाणात ग्रंथालयाचा वापर केला जाईल. ग्रंथालयात असलेला ग्रंथ संग्रह अधिक लोकापर्यंत पाहोचेल म्हणून वर्तमानकाळात ग्रंथालयानी ई सेवा देण्याचे प्रमाण वाढविले पाहिजे.

संदर्भ सुची :—

१. गवाणकर, चिन्मय. आणि तेंडूलकर आशिष. (२०१९ जुलै २१). इंटरनेटच्या चष्म्यातून निवडणूक. दै. लोकसत्ता.

२. जैन, प्रकाश आणि इतर. समग्र ग्रंथालय आणि माहितीशास्त्र. (द्वितीय आवश्त्ती पुर्नमुद्रण २०१३). नागपूर: विश्व पब्लिशर्स अँन्ड डिस्ट्रिब्यूटर्स.

३. फडके, द. ना. (२०१५). ग्रंथालय संगणकीकरण आणि आधुनिकीकरण, (सहावी आवश्त्ती). पुणे: युनिव्हर्सल प्रकाशन..

४. लेले, वि. वि. (२०१५). समग्र ग्रंथालय आणि माहितीशास्त्र. पुणे: युनिव्हर्सल प्रकाशन.

५. लेले, वि. वि. (२०१५). समग्र ग्रंथालय आणि माहितीशास्त्र. पुणे: युनिव्हर्सल प्रकाशन.

SANSKRUTI INTERNATIONAL
MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL
*Journal homepage: http://www.simrj.org.in Journal UOI: 1.01/simrj*

# ग्रंथालयीन व्यवस्थापनात बाहयस्त्रोताच्या माध्यमातून करावयाची विविध कार्ये

डॉ. ढाकणे बालाजी निवृत्तीराव[१] शिंदे सिध्दार्थ बाबूराव[२]

१. प्राचार्य, कै. सौ. शेषाबाई सीताराम मुंढे, कला महाविद्यालय, गंगाखेड,
जि. परभणी. पिन कोड – ४३१५१४ Email: ssmac.gkd@rediffmail.com
२. ग्रंथपाल कै. सौ. शेषाबाई सीताराम मुंढे, कला महाविद्यालय, गंगाखेड,
जि. परभणी. पिन कोड – ४३१५१४ Email: librarianssmgkd@gmail.com

*सार :*

*प्रस्तूत लेखात महाविद्यालयीन ग्रंथालयात बाहयस्त्रोताची आवश्यकता याबाबत अभ्यास करण्यात आला आहे. ग्रंथालयात मनुष्यबळ हे आवश्यकतेच्या प्रमाणात खुपच कमी असते. वाचकांना दर्जेदार सेवा देण्यासाठी बाहयस्त्रोताची मदत घेवून ग्रंथालय हे आधुनिक सेवा सुविधा पुरविणारे माध्यम म्हणून तयार करणे हि आजच्या काळाची गरज बनली आहे. ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांना ग्रंथालयातील सर्व कामे करणे शक्य होत नाही. अशा वेळेस ग्रंथालयानी बाहयस्त्रोताची मदत घेवून ग्रंथालयामार्फत आधूनिक सेवा व सुविधा पुरविण्यासाठी उपयोग केला तर वाचकाना जलद सेवा देण्यास तसेच माहिती पोचविण्यासाठी मदत करता येईल तसेच ग्रंथालयाबाबत वाचकामध्ये वाचन रूची वाढविण्यासाठी मदतच होईल.*

***कि वर्डस :– ग्रंथालयीन व्यवस्थापन, बाहयस्त्रोत***

## प्रस्तावना :

बाहयस्त्रोताचा उपयोग फार पुर्वीपासून उदयोगधंदयामध्ये करण्यात येत आहे. सध्या सर्वत्र क्षेत्रामध्ये याचा वापर करण्यात येत आहे. शासकीय संस्था पण याचा वापर करून काम करण्यात गती प्राप्त करीत आहेत. तसेच सर्व कामासाठी कायमस्वरूपी कर्मचारी नियुक्त करणे हे कोणत्याही संस्थेस परवडणारे राहिले नाही. म्हणूनच बाहयस्त्रोतामार्फत कामे करून घेण्यावर संस्था, उद्योगधंदे याचा भर वाढत आहे. याला महाविद्यालयीन ग्रंथालये पण अपवाद नाहीत. भारतीय ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या ग्रंथालयशास्त्राच्या पाचव्या सिध्दांताप्रमाणे ग्रंथालय ही वाढणारी संस्था आहे. यात ग्रंथ, नियतकालीके, वर्तमानपत्रे तसेच वाचक यांची संख्या वाढत जात असते. अशावेळेस ग्रंथालयीन कर्मचारी वर्ग हा मर्यादीत असतो. अशा वेळेस ग्रंथालयीन कामकाज

करण्यासाठी जर बाहयस्त्रोताची मदत घेतली तर ती कामे पण होत राहतील व ग्रंथालयीन कर्मचाऱ्यास त्याची दैनदिन कामे पण करता येतील. बाहयस्त्रोताचा वापर करून ग्रंथालयीन कामकाजात नाविन्य तसेच आधूनिकीकरण करता येईल. सध्याच्या परीस्थितीत देशातील सर्वच ग्रंथालये कोणते ना कोणते काम हे बाहयस्त्रोताच्या मदतीने करून घेत असल्याचे दिसून येते.

बाहयस्त्रोताच्या मदतीमूळे अपूरे मनूष्यबळ असले तरी पण त्याची कमतरता जाणवत नाही. एकंदरीत बाहयस्त्रोचा वापर करणे हि काळाची गरज बनली आहे. ग्रंथालय पण वाचकांना सेवा व सुविधा देणारी संस्था आहे. ग्रंथालयासाठी बाहयस्त्रोताची मदत घेवून कार्य करणे हे अतिशय उपयुक्त व परीस्थितीला धरून आहे. ग्रंथालयीन संगणकीकरण, ग्रंथाचे बाईडीग, ग्रंथालय वेबसाईट, ग्रंथालयातील विविध इलेक्ट्रिक वस्तूची देखभाल, ग्रंथालय परीसराची स्वच्छता तसेच सुरक्षाव्यवस्था ही कामे बाहयस्त्रोताच्या मदतीने केली तर ग्रंथालय कर्मचाऱ्याचा वेळ व उर्जा वाचून ठरलेली दैनदिन कामे करण्यास मदत होईल.

**ग्रंथालय व्यवस्थापन :—**

वाचकांना सेवा देण्यासाठी कमीत कमी पैसा, शक्ती, वेळ व साहित्य वापरून ग्रंथालयीन कर्मचाऱ्याकडून काम करवून घेणे म्हणजे ग्रंथालय व्यवस्थापन होय.[१] व्यवस्थापनासाठी पर्यायी शब्द प्रशासन हा वापरला जातो. थोडक्यात ग्रंथालयीन सर्व कामकाज ठराविक पध्दतीने चालविणे होय.

**बाहयस्त्रोत :—**

बाहयस्त्रोत म्हणजे संस्थेबाहेरील व्यक्ती किंवा संस्था यांच्याकडून एखादे काम करून घेण्याच्या पध्दतीला बाहयस्तोत असे संबोधले जाते. वाचकांची आवश्यकता पुर्ण करता यावी व ग्रंथालय सेवकाची कार्यक्षमता वाढावी यासाठी नविन तंत्रप्रणालीची गरज भासू लागली आहे.[२] म्हणूनच हि गरज भागविण्यासाठी बाहयस्त्रोताची मदत घेता येते.

**महाविद्यालयीन ग्रंथालयातील बाहयस्त्रोताच्या माध्यमातून करावयाची कार्ये :—**

महाविद्यालयीन ग्रंथालयात प्रामूख्याने पुढील कार्ये करत असताना बाहयस्त्रोताचा जर वापर केला तर जास्तीत जास्त वाचकापर्यंत ग्रंथालयाचा प्रसार होईल. उपयूक्त बाहयस्त्रोत माध्यमे पुढीलप्रमाणे आहेत.

**१. Software Installation :—**

ग्रंथालयात विविध प्रकारच्या आज्ञावली वापरल्या जात असतात. यात SOUL, E-Granthalaya, SLIM, LIBMAN या आज्ञावलीच्या साहयाने ग्रंथालय संगणकीकरण करण्याचा प्रयत्न केला जात असतो. पण अशा आज्ञावली प्रस्थापीत करावयाचे काम खुपच किचकट तसेच कठीण असते. अशा वेळेस बाहयस्त्रोताची मदत घेवून ग्रंथालयात आज्ञावली प्रस्थापीत करावयाचे काम सहज होवून जाते. यासाठी ग्रंथपालास संगणक आज्ञावली प्रस्थापीत करून देणाऱ्या व्यक्तिस किंवा संस्थेची मदत घ्यावी लागते. आज्ञावली प्रस्थापीत झाल्यानंतर सुध्दा विविध प्रकारच्या तांत्रीक अडचणी येत असतात. त्या सोडविण्यासाठी बाहयस्त्रोताची गरज भासते. म्हणून ग्रंथपालानी याकामाशी संबधीत व्यक्ति किंवा संस्थेशी करार करून घ्यावा. जेणेकरून ते त्याबाबतीत मदत करतील. तसेच अशा कामासाठी कायमस्वरूपी कर्मचारी पण मिळत नसतो म्हणून बाहयस्त्रोताच्या माध्यमातून ग्रंथालय आज्ञावली प्रस्थापीत करून घ्यायचे काम करार करून ठराविक रक्कमेच्या बदल्यात करून घ्यावे.

**२. डेटा फिडीग :—**

ग्रंथालय आज्ञावली प्रस्थापीत केल्यानंतर ग्रंथालयातील सर्व ग्रंथाचा डेटा भरणे आवश्यक असते. अशा वेळेस ग्रंथालयीन कर्मचारी जर डेटा फिडीगचे काम करत असेल तर वाचकाशी संबधीत इतर कामे होवू शकत नाहीत. ग्रंथालयातील ग्रंथसंख्या पण हजारोच्या संख्येने असते. म्हणून अशा वेळेस डेटा फिडीगचे काम एखाद्या बाहेरच्या व्यक्तिस किंवा संस्थेस देणे फायद्याचे ठरते. सध्या बऱ्याच ग्रंथालयानी डेटा फिडींगचे काम बाहेरून करून घेण्यावर भर दिलेला असल्याचे दिसून येते. डेटा फिडींग करणारे व्यक्ती किंवा संस्था खुपच जलद गतीने काम करून देतात. तसेच हे काम चालू असताना ग्रंथालयातील इतर कामकाजावर त्याचा कोणताही फरक पडत नाही. त्यामूळे ग्रंथपालाने डेटा फिडींग करणाऱ्या व्यक्ति किंवा संस्थेशी ठराविक रक्कमेचा करार करून हे काम करून घेतल्यास फायद्याने राहते.

**३. बारकोडींग :—**

बारकोडींगचा वापर जास्तीत जास्त करून उद्योगधंद्यात होत होता. पण ग्रंथालयात बारकोडींग तंत्रज्ञानाच्या साहयाने ग्रंथ देवघेव व ग्रंथ साठा पडताळणी करण्याचे काम खुपच वेगाने होत असल्याचे दिसून येते. लहान ग्रंथालय असेल तर १ ग्रंथपाल व एखादा सहायक असतो. मोठे ग्रंथालय असेल तर १ ग्रंथपाल व साधारण ५ ते १० मदतनिस असतात. त्यामूळे ग्रंथालयात अंतर्गत कर्मचाऱ्याच्या मदतीने उपलब्ध ग्रंथाचे बारकोडींगचे

काम जास्त वेळ खाणारे होत असते. तसेच ग्रंथालयीन कर्मचारी जर या कामात व्यस्त झाले तर ग्रंथालयात येणाऱ्या वाचकांना मदत करायला कोणी उपलब्ध होत नसते. म्हणून बारकोडींग करण्याचे काम जर बाहयस्त्रोताच्या मदतीने केले तर ग्रंथालयीन कर्मचारी वाचकासाठी उपलब्ध राहून वाचकांना दैनदिन सेवा दिल्या जातात. ग्रंथालयीन कामकाजात खंड न पडता काम पुर्ण होते. बारकोडींगचे काम करून घेत असताना त्यांच्याशी करार करूनच हे काम दिले जावे. तसेच बारकोडींग मूळे वाचक व ग्रंथालयीन कर्मचारी यांचा वेळ वाचण्यास पण मदत होते.

**४. आर.एफ. आय.डी. तंत्रज्ञान :—**

देशातील प्रमूख विद्यापीठामध्ये रेडिओ फ्रिक्वेन्सी आयडेंटीफिकेशन या तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. हे तंत्रज्ञान खर्चीक आहे. पण या तंत्रज्ञानामूळे ग्रंथालयातील ग्रंथ गहाळ होण्याचे प्रमाण पुर्णपणे कमी होण्यास मदत होते. म्हणून प्रत्येक ग्रंथालयानी या तंत्रज्ञानाबाबत सकारात्मक विचार केला पाहिजे. हे तंत्रज्ञान वापरण्यासाठी ग्रंथालयीन कर्मचारी वर्गास कठीण असते. अशा वेळेस हे काम बाहयस्त्रोताच्या मदतीने करून घ्यावे. जेणेकरून ग्रंथालयीन कामकाज करत असताना अडचण होणार नाही.

**५. आयकार्ड बनविणे :—**

दरवर्षी ग्रंथालयात नविन नविन वाचक शेकडो ते हजारोच्या संख्येने सभासद होत असतात तसेच तितकेच वाचक हे सभासद म्हणून नुतनीकरण करून घेत असतात. अशा वेळेस सर्व वाचकांना ग्रंथालयातून ओळखपत्र देणे हे ग्रंथपालापुढील मोठी समस्या असते. म्हणून ग्रंथपालाने आयकार्ड बनविण्याचे काम बाहयस्त्रोताकडे किंवा निविदा मागवून देवून टाकले पाहिजे. ग्रंथालयात आयकार्डसाठी आवश्यक माहितीचे नोंदणी फार्म वितरीत करण्याची व्यवस्था करावी. जणेकरून वाचक आपली माहिती भरून ग्रंथालयात आणून देतील व ग्रंथपाल ग्रंथालयामार्फत ठरलेल्या बाहयस्त्रोत माध्यमाकडून वाचकासाठी आयकार्ड उपलब्ध होतील. तसेच आयकार्ड हे ग्रंथालय आज्ञावलीशी सुसंगत असणारे असावेत. म्हणून हे काम बाहेर देवून ग्रंथालयीन कर्मचारी व वाचक यांचा वेळ वाचविण्यास मदत होत असल्याचे दिसून येते.

**६. ग्रंथ बाईडींग :—**

ग्रंथालयातील ग्रंथ दरवर्षी विविध वाचक हाताळत असतात. ग्रंथ जसजसा जुना होत जाईल तसतसे त्याची शिलाई तुटणे, ग्रंथ फाटणे अशा समस्या निर्माण होत असतात. तसेच दरवर्षी नियतकालीकाचे बांधीव खंड तयार केले जातात. महाविद्यालयीन ग्रंथालयात सहसा ग्रंथ बाईडींग कर्मचाऱ्याचे पद अस्तित्वातच नाही. तसेच बाईडींगसाठी

विविध प्रकारच्या मशीनची आवष्यकता असते. तसेच बाईडींचे काम ग्रंथालयात करायचे ठरविले तर त्याला जागा पण जास्त लागते. म्हणून अशा वेळेस ग्रंथालयानी ग्रंथ व नियतकालीकाचे बांधीव खंड बाईटींग करण्याचे काम बाहयस्त्रोताच्या माध्यमातून करून घ्यायला पाहिजे. त्यामूळे ग्रंथालयातील ग्रंथाचे जतन होण्यास मदत होईल.

**७. ग्रंथ साठा पडताळणी :—**

ग्रंथ साठा पडताळणी म्हणजे ग्रंथालयात दाखल झालेल्या प्रत्येक ग्रंथाची तपासणी करणे होय.[3]ग्रंथालय जर लहान असेल तर दर एक वर्षानी व ग्रंथालय जर मोठे असेल तर दर तीन वर्षानी ग्रंथ साठा पडताळणीचे काम करणे गरजेचे असते. ग्रंथ साठा पडताळणीचे काम जर बाहयस्त्रोताच्या माध्यमाने केले तर ग्रंथालयीन कर्मचारी व ग्रंथपालास नेमलेली कामे करता येतात. म्हणून बाहयस्त्रोताच्या माध्यमातून कामे करून घेत असताना ग्रंथ साठा पडताळणी हे एक काम करून घेता येते.

**८. ग्रंथालय वेबसाईट बनविणे तसेच अपडेट करणे :—**

ग्रंथालयाची वेबसाईट बनविण्याचे काम बाहयस्त्रोताच्या माध्यमातून करून घेता येते. ग्रंथालयीन कर्मचारी तसेच ग्रंथपाल यांना ग्रंथालयाची वेबसाईट बनविणे हे कठीण तसेच वेळ घेणारे काम आहे. म्हणून अशा वेळेस ग्रंथालयानी वेबसाईट बनविणाऱ्या व्यक्ति किंवा संस्था यांच्याशी करार करून हे काम करून घेणे आवश्यक असते. तसेच ग्रंथालयात विविध प्रकारचे उपक्रम होत असतात. ते वाचकापर्यंत पोचविण्यासाठी सदर वेबसाईट अपडेट करणे गरजेच आहे. म्हणून बाहयस्त्रोताच्या माध्यमातून हि कामे करून घेणे गरजेचे आहे.

**९. हार्डवेअर मेंटेनन्स :—**

ग्रंथालयीन कामकाजासाठी ग्रंथालयात संगणक घेतले जातात. संगणकामध्ये हार्डवेअर रॅम, मदरबोर्ड तसेच मॉनीटरशी संबधीत विविध समस्या निर्माण होवू शकतात. अशा वेळेस हे काम करणाऱ्या व्यक्ति किंवा संस्थेच्या माध्यमातून अशा समस्या सोडविल्या जावू शकतात. म्हणून ग्रंथालयानी बाहयस्त्रोतामार्फत करावयाच्या कामाचा विचार करत असताना हार्डवेअर मेंटेनन्सचे काम बाहयस्त्रोतामार्फत करून घ्यावे.

**१०. सुरक्षा व्यवस्था :—**

ग्रंथालयातील ग्रंथ व इतर सामग्रीची काळजी घेणे हे ग्रंथालयाचे मुख्य कार्य आहे. अशा वेळेस सी.सी.टी.व्ही. यंत्रणा बाहयस्त्रोताच्या माध्यमातून बसवून सुरक्षेची

काळजी घेता येते. तसेच सुरक्षारक्षक पुरविणाऱ्या संस्थेशी करार करून पण याबाबत योग्य त्या उपाययोजना बाहयस्त्रातामार्फत करता येतात.

### ११. एस. एम. एस. अलर्ट :—

ग्रंथालयीन वाचकांना ग्रंथ देवघेव झाल्यानंतर मेसेज पाठविण्याची सोय म्हणजेच एस. एम. एस. अलर्ट हि सेवा पुरविणे होय. एस. एम. एस. अलर्ट सेवा देणाऱ्या संस्थेशी करार करून वाचकांना हि सेवा उपलब्ध करून देता येते. तसेच अचानक ग्रंथालय काही कारणाने बंद असल्यास किंवा ग्रंथालयात एखादा कार्यक्रम तसेच उपक्रम होणार असल्यास याची माहिती देण्यासाठी हि सेवा उपयोगात येत असते. म्हणून बाहयस्त्रोताकडून कोणते कार्ये करून घ्यायची याचा विचार करत असताना या सेवेचा प्रामूख्याने विचार केला जावा.

### १२. ई मेल अलर्ट :—

ग्रंथालयीन वाचकांना ग्रंथ देवघेव झाल्यानंतर ईमेल पाठविण्याची सोय म्हणजेच ई मेल अलर्ट हि सेवा पुरविणे होय. ई मेल अलर्ट सेवा देणाऱ्या संस्थेशी करार करून वाचकांना हि सेवा उपलब्ध करून देता येते. तसेच अचानक ग्रंथालय काही कारणाने बंद असल्यास किंवा ग्रंथालयात एखादा कार्यक्रम तसेच उपक्रम होणार असल्यास याची माहिती देण्यासाठी हि सेवा उपयोगात येत असते. म्हणून बाहयस्त्रोताकडून कोणते कार्ये करून घ्यायची याचा विचार करत असताना या सेवेचा प्रामूख्याने विचार केला जावा.

### १३. इलेक्ट्रिक उपकरणे दुरूस्ती :—

ग्रंथालयात विविध प्रकारची इलेक्ट्रिक उपकरणे असतात. यात कधी कधी बिघाड होत असतो. अशा वेळेस हि कामे करणाऱ्या व्यक्ती किंवा संस्थेशी करार करून कामे करून घेता येतात. यामूळे ग्रंथालयातील सर्व इलेक्ट्रिक उपकरणाची निगा पण राखली जाते. तसेच इलेक्ट्रिक उपकरणाचे काम करण्याचा कालावधी पण वाढण्यास मदत होते.

### १४. ग्रंथालय ऑडीट :—

ग्रंथालयास दरवर्षी मिळणारे अनुदान, उत्पन्न तसेच खर्च याचा लेखाजोखा मांडण्याचे काम ग्रंथालय ऑडीट मार्फत होत असते. तर हे ऑडीटचे काम खुपच किचकट तसेच कठीणही असते. म्हणून ग्रंथालय ऑडीट करून घेण्याचे काम या कामात पारंगत असलेल्या एखाद्या तज्ञ व्यक्तिकडून किंवा संस्थेकडून करून घ्यावे. म्हणून बाहयस्त्रोताच्या माध्यमातून हे काम जर करून घेतले तर उत्तमच राहिल.

### १५. पेस्ट कंट्रोलींग :–

ग्रंथालयातील ग्रंथसंग्रहाची काळजी घेण्याच्या दृष्टीने बाहयस्त्रोताच्या माध्यमातून पेस्ट कंट्रोलींगचे काम करून घेणे हे ग्रंथासाठी वापरण्याचा कालावधी वाढविण्यासाठी आवश्यक आहे. ठराविक मुदतीने हि प्रक्रिया करून घ्यावी. जेणेकरून ग्रंथालयातील ग्रंथसंग्रह चांगला राहण्यास मदत होईल.

### समारोप :–

एकंदरीत ग्रंथालयानी वरील कार्ये जर बाहयस्त्रोताच्या मदतीने करून घेतली तर ग्रंथालये आधूनिक सेवा व सुविधा पुरविणारी केंद्रे बनतील. तसेच ग्रंथपाल व ग्रंथालयीन कर्मचारी यांच्यावरचा पण कामाचा ताण कमी होण्यास मदत होईल. तसेच नविन उर्जेने आणि नविन कल्पनेने ग्रंथालयात सेवा सुविधा पुरविण्यावर भर दिला जाईल. तसेच बाहयस्त्रोताच्या मदतीने कामे करून घेतल्यामूळे त्या कामात चुका होण्याचे प्रमाण हे खुपच नगण्य राहिल. त्यामूळेच प्रत्येक महाविद्यालयीन ग्रंथालयाने बाहयस्त्रोतामार्फत कामे करून घेवून बदलत्या परीस्थितीनुसार बदलले पाहिजे.

### संदर्भ सुची :–

१. राठोड–पवार, मंदाकिनी आणि कुलकर्णी जगदीश. ग्रंथालय प्रशासन.(२०११). लातूर : अरूणा प्रकाशन.

२. जैन, प्रकाश आणि इतर. समग्र ग्रंथालय आणि माहितीशास्त्र. (द्वितीय आवृत्ती पुर्नमुद्रण २०१३). नागपूर: विश्व पब्लिशर्स अॅन्ड डिस्ट्रिब्यूटर्स.


३. लेले, व. वि. समग्र ग्रंथालय आणि माहितीशास्त्र. (२०१५). पुणे : युनिव्हर्सल प्रकाशन.

ISSN 2394-5303

Issue-56, Vol-02 August 2019

# Printing Area®

Peer Reviewed International Refereed Research Journal



Editor

Dr.Bapu G.Gholap

Principal
Late.Sow.Sheshabai
Sitaram Mundhe Art's College
Gangakhed Dist.Parbhani

14) आगरकरांचे धर्मचिंतन आणि ख्रिस्तीधर्म
डॉ. राजेंद्र साहेबराव धाये & डॉ. सखाराम पंढरीनाथ टकले, जि. जालना ||76

15) स्त्रीभ्रूणहत्या या सामाजिक समस्याची चिकित्सा
प्रा. डॉ. एस. डी. दहिकांबळे, जि. नांदेड ||79

16) शिक्षक व्यावसायिक विकास आणि उत्तरदायित्व
प्रा. डॉ. प्रकाश अ. जगताप, पुणे ||82

17) ग्रामस्वच्छता आणि गांधीविचार
डॉ. बिभीषण करे, नांदेड ||85

18) महाविद्यालयीन ग्रंथालयात सोशल मिडीयाचा प्रभावी वापर
डॉ. ढाकणे बालाजी निवृत्तीराव & शिंदे सिध्दार्थ बाबूराव, जि. परभणी ||89

19) शेती विषयक माहितीच्या समाधानतेचा चिकित्सक अभ्यास : उमरगा तालुका
डॉ. सुनिल पांडूरंग सूर्यवंशी, कोल्हापूर ||92

20) प्रेमनंद गज्वी यांचे ऐतिहासिक संशोधनावर आधारित नाटक 'गांधी-आंबेडकर'
प्रा. डॉ. बाळासाहेब गावडे, जि. बीड ||96

21) हैदराबाद संस्थानातील शिक्षण पध्दती
प्रा. डॉ. टकले सखाराम पंढरीनाथ & प्रा. डॉ. राजेंद्र साहेबराव धाये, जि. जालना ||98

22) गुरू नानकांची मुलतत्वे व शिकवण — एक विचार
प्रा. डॉ. स्वाती नागोराव कुलकर्णी, परभणी ||100

23) छायावाद एवं कवि निराला के काव्य में उभरे विभिन्न दृष्टिकोण
असीम दास, होजाई (असम) ||103

24) कवि श्री निराला की कविताओं में परिलक्षित अरविन्द दर्शन का प्रभाव
Dr. Balaji Naik L., Bangalore ||106

25) सहरिया जनजाति : एक भौगोलिक अध्ययन (मुरैना एवं श्योपुर जिले के विशेष ...
अम्बेडकर जाटव, ग्वालियर (म.प्र.) ||109

26) भारतीय संस्कृति ओर बौद्ध धर्म :— एक अध्ययन
बेबी कुमारी, बोधगया ||113

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com



Principal
Late.Sow.Snehshabai
Sitaram Mundhe Art's College

18

# महाविद्यालयीन ग्रंथालयात सोशल मिडीयाचा प्रभावी वापर

डॉ. ढाकणे बालाजी निवृत्तीराव
प्राचार्य,
कै. सौ. शेषाबाई सीताराम मुंढ कला महाविद्यालय
गंगाखेड, जि. परभणी

शिंदे सिध्दार्थ बाबूराव
ग्रंथपाल,
कै. सौ. शेषाबाई सीताराम मुंढे कला महाविद्यालय
गंगाखेड, जि. परभणी

**********

सार :–

प्रस्तूत लेखात महाविद्यालयीन ग्रंथालयात सोशल मिडीयाचा प्रभावी वापर याबाबत अभ्यास करण्यात आला आहे. आजचे युग सोशल मिडीयाचा वापर करणारे युग आहे. सोशल मिडीयाच्या माध्यमातून प्रत्येक जण आपले मत व्यक्त करताना दिसत आहे. आपल्याकडील माहिती इतरासमोर मांडण्याचे सर्वोत्तम साधन म्हणजे सोशल मिडीया. सोशल मिडीयाचा वापर हा ग्रंथालयीन उपयोगासाठी करून वाचकाना ग्रंथालयाबाबतची माहिती पोचविण्यासाठी मदत करता येईल तसेच ग्रंथालयाबाबत वाचकामध्ये वाचन रूची वाढविण्याची कामी मदतच होईल.

कि वर्डस :– महाविद्यालयीन ग्रंथालय, सोशल मिडीया

**प्रस्तावना :–**

भारतात इ. स. २०१६ साला पासून जिओ या कंपनीने स्वस्त फोर जी इंटरनेट सेवेस सुरूवात केली. त्यानंतर देशातील सर्वच कंपन्यानी सामान्य लोकांना आकर्षीत करण्यासाठी फोर जी इंटरनेट सेवेचे दर एकदम माफक ठेवले तसेच स्वस्त स्मार्टफोनची निर्मीती पण होवू लागली. त्यामूळे २०१६ नंतर भारतात इंटरनेट वापरकर्त्यांची संख्या खुपच वेगाने वाढत गेली. इंटरनेट रोवेशी संबधीत ICUBE संस्थेने प्रकाशित केलेल्या २०१८ च्या अहवालानुसार डिसेंबर २०१९ पर्यंत आपल्या देशात इंटरनेट वापर करणाऱ्या लोकांची संख्या एकूण ६३ कोटीपर्यंत जाणार असा अंदाज वर्तवलेला आहे. तसेच ग्रामीण भागातील इंटरनेट वापर करणाऱ्याची संख्या ही २९ कोटी पर्यंत असणार आहे. भारतातील ग्रामीण भागातील इंटरनेट वापर करणाऱ्याचे प्रमाण हे वार्षिक ३५% या वेगाने वाढत असल्याचे दिसून येते. सुरूवातीला इ. स. १९९५ साली इंटरनेट भारतात सुरू झाले त्यावेळेस इंटरनेट हे श्रीमंत व शहरी वर्गातील लोकासाठीच उपलब्ध होते पण ते आता ग्रामीण भागातील सर्वसामान्य माणसाच्या आवाक्यात आले आहे. इंटरनेट वापराचा हा वेग याच प्रमाणात राहिला तर २०१९ ला शासनाने जाहिर केल्याप्रमाणे २०२२ पर्यंत इंटरनेट सर्वासाठी उपलब्ध करण्यात येणार आहे.[१] आज सर्वच क्षेत्रात इंटरनेटचा वापर वाढला आहे. इंटरनेटच्या वापरामूळे कोणतेही काम हे खुपच जलद रितीने होत असल्याचे दिसून येते. इंटरनेटच्या वापरामूळेच सोशल मिडीया वापर करणाऱ्याचे प्रमाण हे खुपच वेगाने वाढत आहे. शहरी तसेच ग्रामीण भागातील महाविद्यालयीन ग्रंथालयानी पण सोशल मिडीयाची मदत घेवून जास्तीत जास्त वाचकांना ग्रंथालयाकडे येण्यास प्रवृत्त केले पाहिजे.

**महाविद्यालयीन ग्रंथालय :–**

अभ्यासक्रम पुर्ण करण्यासाठी विद्यार्थ्यांना सहाय करणे, व्याख्याने, प्रयोगशाळा अथवा इतर साधनाने जे ज्ञान विद्यार्थ्यांना प्राप्त होवू शकत नाही अशा पुरक ज्ञानाची सोय करणारी संस्था म्हणजेच महाविद्यालयीन ग्रंथालय होय.[२] एकंदरीत महाविद्यालयीन ग्रंथालयात कमिक पुस्तकाबरोबरच इतर वाचनसाहित्यात संदर्भ, विविध विषयाचे कोश व इतर प्रकारचे वाचनसाहित्य असते. महाविद्यालयीन ग्रंथालय हे विद्यार्थ्यासाठी ज्ञानाचा महासागर असलेले ठिकाण आहे.

**सोशल मिडीया :–**

मनुष्य हा प्रागैतिहासीक काळापासूनच समाजशिल प्राणी राहिला आहे. काळानुसार संवाद

प्रकियेत बदल झालेले आपणास दिसून येतात. सध्याच्या परीस्थितीत सोशल मिडीया हे संवादाच प्रमुख माध्यम बनले आहे. आपल्यापासून दुर राहत असलेले नातेवाईक तथा मित्र यांना सोशल मिडीयाच्या माध्यमातून संदेश, छायाचित्रे तथा व्हिडीओ याची देवाणघेवाण करता येते. सद्यपरिस्थितीत सर्वच क्षेत्रात सोशल मिडीया वापर होत असताना दिसून येते. मुळात Social media are web-based communication tools that enable people to interact with each other by both sharing and consuming information.[3] तसेच Boyd & Ellison यांच्या मतानुसार Social Media has been defined as websites which allow profile creation and visibility of relationships between users[4] महाविद्यालयीन ग्रंथालये पण या मार्गाचा अवलंब करून काळानुसार बदलत चालली आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाची मदत घेवून सोशल मिडीयाचा वापर करून ग्रंथालये आधुनिक बनत चालली आहेत.

**महाविद्यालयीन ग्रंथालयातील उपयुक्त सोशल मिडीया माध्यमे :—**

महाविद्यालयीन ग्रंथालयात प्रामूख्याने पुढील सोशल मिडीया माध्यमाचा जर वापर केला तर जास्तीत जास्त वाचकापर्यंत ग्रंथालयाचा प्रसार होईल. उपयूक्त सोशल मिडीया माध्यमे पुढीलप्रमाणे आहेत.

१. फेसबुक :— ही कपंनी मार्क झुकेरबर्ग याने त्याच्या महाविद्यालयीन सहकाऱ्याबरोबर स्थापन केलेली अमेरीकेतील आहे. जगातील सर्वात मोठया चार कंपन्यापैकी हि एक कंपनी आहे. फेसबुकचा वापर करणाऱ्याची संख्या ही अब्जामध्ये पाहोचली आहे. फेसबुकने काळानुसार जे बदल केले आहेत. त्यामूळे याची उत्तरोत्तर लोकप्रियता वाढतच आहे. याचा ग्रंथालयामध्ये पण चांगला उपयोग होवू शकतो. ग्रंथपालास किंवा ग्रंथालयीन कर्मचाऱ्यास प्रत्येक वाचकास माहिती देणे हे कठीण काम आहे. पण त्याला जर वाचकांना माहिती पोचवायची असेल तर फेसबुकवर संदेश, छायाचित्र किंवा एखादा व्हिडीओ टाकून ती माहिती पोचविता येते. तसेच ग्रंथालयाचे फेसबुक पेज जर तयार केलेले असेल तर विविध उपक्रमाची माहिती, नविन वाचन सग्रंह याची पण माहिती देता येते. ग्रंथालयाच्या प्रसारासाठी फेसबूक हे एक उत्तम प्रकारचे सामाजिक माध्यम आहे.

2. LinkedIn :— याची सुरूवात २००२ मध्ये झाली. हे माध्यम जवळपास २०० देशामध्ये वापरले जाते. व्यावसायीक लोकाचे नेटवक यात असलयाचे दिसून येते. डिसेंबर २०१८ मध्ये अलेक्सा इंटरनेट रँकिंग नुसार जगातील २८ वी लोकप्रिय वेबसाईट असल्याचे दिसून येते. याच्या वापरामूळे विविध विषयातील तज्ञ लोकांची माहिती मिळण्यास मदत होते. हे माध्यम वापरणाऱ्या लोकाची संख्या हि कोटी मध्ये असून उत्तरोत्तर त्यात वाढच होत असल्याचे दिसून येते.

3.Twitter :— जॅक डोरसी, नोहा ग्लास, बिझ स्टोन आणि इव्हॉन विलीयम्स यांनी मार्च २००६ मध्ये याची निर्मीती केली तसेच जुलै २००६ पासून हे माध्यम म्हणून वापरात आणले. सुरूवातीला यात १४० अक्षराचा मेसेज पाठविण्याची सोय होती पण ७ नोव्हेबंर २०१७ पासून २८० अक्षरापर्यंत मेसेज पाठविण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. या माध्यमाने ग्रंथालयाचे खाते बनवून एकदाच मेसेज सर्व वाचकापर्यंत पोहोचविता येतो. वापरणाऱ्याची संख्या हि कोटी मध्ये आहे. ग्रंथालयामार्फत नविन साहित्य आलेले असेल तसेच कार्यालयीन वेळेबाबत मेसेज पाठविता येतो. यामूळे वाचकाला कोठूनही याबाबत माहिती मिळू शकते व वाचक तसेच ग्रंथालयीन कर्मचारी याचा पण वेळ वाचतो. त्यासाठी सर्वच ग्रंथालयानी याचा वापर केला पाहिजे.

4. Telegram :- याची सुरूवात Nikolai व Pavel Durov यांनी इ. स. २०१३ मध्ये केली. माहिती प्रसारीत करण्यासाठीचे हे एक चांगले साधन आहे. टेलीग्राम वापरत असलेल्या लोकांची संख्या पण कोटी मध्ये आहे. यावर विविध विषयाचे ग्रुप आहेत. ग्रंथालयासाठी उपयुक्त असे विविध भाषा साहित्य असणारे ग्रुप आहेत. ग्रंथालयानी पण यावर ग्रुप तयार करून वाचकाना यात सहभागी करून घ्यावे. यामूळे नविन नविन माहिती मिळण्यास मदत होते.

5. युटयूब :— Chad Hurley, Steve Chen, आणि Jawed Karim यांनी युटयूबची स्थापना २००५ मध्ये अमेरीकेमध्ये केली. २००६ मध्ये युटयूब हि कंपनी

गुगलने विकत घेतली. याच्या माध्यमातून व्हिडीओ शेअरींगची सुरूवात झाली. सध्याचया परिस्थितीत लाखोच्या संख्येने विविध विषयातील विविध भाषातील व्हिडीओ यावर उपलब्ध आहेत. तसेच युटयूबने स्वतःचे चॅनल बनविण्याची सोय पण उपलब्ध करून दिली आहे. त्यामूळे याचा वापर करून ग्रंथालयानी युटयूब चॅनलच्या माध्यमातून विविध उपकम तसेच ग्रंथालयाची व्हर्च्यअल टुर उपलब्ध करून द्यावी. जेणेकरून ग्रंथालयाकडे वाचक आकर्षित होतील.

**6. Whats Up :-** यांची सुरूवात २००९ मध्ये झाली. २०१४ मध्ये हिं कंपनी फेसबुकने विकत घेतली. आज जगातील सर्वात जास्त वापरात असलेले हे माध्यम आहे. यामूळे मेसेज, छायाचित्र, व्हिडीओ प्रसारीत करण्यास मदत होते. याच्या माध्यमातून ग्रंथालयानी वाचकाचे वेगवेगळे ग्रुप तयार करून माहिती पाहोचविली पाहिजे. नविन आलेले वाचनसाहित्य तसेच विविध उपकमाची माहिती प्रसारीत करण्याचे हे एक चांगले साधन आहे.

**7. Instagram :-** याची मालकी सध्या फेसबुककडे आहे. हे फोटो आणि व्हिडीओ शेअरींगचे एक चांगले सामाजिक माध्यम आहे. याच्या साहयाने ग्रंथालयात नविन आलेले ग्रंथाचे मुखपृष्ठ तसेच ग्रंथालयासंबधीत विविध उपकमाचे प्रसारण यावर करता येते. सध्या खुपच वेगाने वाढत असलेले हे एक माध्यम आहे.

**समारोप :-** एकंदरीत वरील सोशल मिडीयाच्या माध्यमातून वाचकांना शिघ्र गतीने संवाद साधता येतो. तसेच ग्रंथालयीन सेवा व विविध उपकमाची माहिती पण देता येते. यामूळे वाचक व ग्रंथालयीन कर्मचारी यांचा वेळ पण वाचतो. म्हणून ग्रंथालयानी ग्रंथालयामार्फत जास्तीत जास्त प्रमाणात सोशल मिडीयाच्या माध्यमातून माहिती देण्यावर भर दिला पाहिजे. ग्रंथालयानी कालौघात बदल करीत तंत्रज्ञानाचा स्विकार करीत सोशल मिडीयाच्या माध्यमातून माहिती दिली तर वाचकामार्फत जास्तीत जास्त प्रमाणात ग्रंथालयाचा वापर केला पाहिजे याबाबत मार्गदर्शन होण्यास मदत होईल.

**संदर्भ सुची :-**

१. गवाणकर, चिन्मय आणि तेंडूलकर आशिष. (२०१९ जुलै २१). इंटरनेटच्या चष्म्यातून निवडणूक. दै. लोकसत्ता.

२. जैन, प्रकाश आणि इतर. समग्र ग्रंथालय आणि माहितीशास्त्र. (द्वितीय आवृत्ती पुर्नमुद्रण २०१३). नागपूर: विश्व पब्लिशर्स अॅन्ड डिस्ट्रिब्यूटर्स.

3- https://www.lifewire.com/what-is-social-media-explaining-the-big-trend-3486616

4-https://www.ukais.org/resources/Documents/ukais%202018%20proceedings%20papers/paper_4.pdf

❑❑❑

Volume - 10 (Issue - 6)

April, 2020

ISSN - 2230 - 9578

# Journal of Research and Development

## A Multidisciplinary International Level Refereed Journal

COSMOS
IMPACT FACTOR

5.13



Principal
Late.Sow.Sheshab
Sitaram Mundhe Art's College
Gangakhed Dist.Parbhani

Editor : Dr. R.V. Bhole

'Ravichandram' Survey No-101/1, Plot No-23, Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102
Email - info@jrdrb.com Visit - www.jrdrvb.com

# अनुक्रमणिका


| Sr. No. | Name | Title of the Paper | Page No. |
|---|---|---|---|
| 01 | प्राचार्य, डॉ.एस.एस.गोरे | शिक्षणसंस्थांच्या परिणामकारक प्रशासनाचा अभ्यास | 1-4 |
| 02 | प्राचार्य, डॉ. टाकणे बालाजी निवृत्तीराव | आधुनिक काळातील महाविद्यालयीन ग्रंथपालापुढील प्रमुख समस्या | 5-7 |
| 03 | डॉ. प्रमिला हरीदास भुजाडे | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जलनीती | 8-13 |
| 04 | प्रा. डॉ. चंद्रशेखर टाकरे | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक कार्यातील योगदान | 14-16 |
| 05 | प्रा.डॉ. विजयसिंग आय. गिरासे | यु.जी.सी.च्या दहाव्या व अकराव्या योजनांचा नंदुरबार जिल्ह्यातील उच्च शिक्षणावर झालेल्या परिणामांचा चिकित्सक अभ्यास | 17-22 |
| 06 | Dr. Madhukar Janrao Nikam | Literary Devices in Dr. B.R. Ambedkar's 'Buddha and His Dhamma' | 23-26 |
| 07 | Dr. Aarti S. Pawar | Social Justice and Dalits | 27-30 |
| 08 | Dr. Mahadeo Vishnu Mate | Impact of an Interview Technique in Researches | 31-34 |
| 09 | Dr. Balasaheb G. Pawar | Confessions in the Poetry of Anne Sexton | 35-38 |
| 10 | Dr.Tarode Vijay Laxman | Women empowerment through political participation in India | 39-40 |
| 11 | Dr. Vaishali Meshram | A Study of the East-West Encounter in Bhabani Bhattacharya's Novels with Special Reference to Music for Mohini and Shadow from Ladakh | 41-43 |
| 12 | प्रा.डॉ. महेंद्र जे. रघुवंशी | स्वातंत्र्योत्तर हिन्दी उपन्यास साहित्य | 44-47 |
| 13 | प्रा. डॉ. कल्याण विठ्ठल मोरे | लैंगीक शोषण या सामाजीक समस्येचा समाजशास्त्रीय अभ्यास | 48-51 |
| 14 | प्रा.डॉ. नानाजी दगा भामरे | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे वृत्तपत्रे व ग्रंथ संपादनाविषयी योगदान | 52-55 |
| 15 | डॉ. रत्ना लाला जवरास | संशोधनातील मुलाखतीचे फायदे व तोटे | 56-58 |
| 16 | प्रा.डॉ. रविराज अच्युत फुरडे | संप्रेषण प्रक्रिया : शाळा मूल्यांकनाची नवीन पद्धती - शाळा सिद्धी | 59-62 |
| 17 | प्रा.डॉ. संजय श्रीहरी कुंभारे | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक विचार | 63-65 |
| 18 | डॉ. ज्ञानेश्वर काशिनाथ भामरे | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची स्त्रीयांविषयी भूमिका | 66-68 |




Principal
Late.Sow.Sheshabai
Sitaram Mundhe Art's College
Gangakhed Dist.Parbhani

# आधुनिक काळातील महाविद्यालयीन ग्रंथपालापुढील प्रमुख समस्या

डॉ. ढाकणे बालाजी निवृत्तीराव
प्राचार्य – कै. सौ. शेषाबाई सीताराम मुंढे
कला महाविद्यालय, गंगाखेड. जि. परभणी.

• सार :–

सध्याचे यूग हे स्पर्धेचे युग आहे. सर्वच क्षेत्रात स्पर्धात्मक वातावरण आहे. महाविद्यालयीन ग्रंथपालाना पण या स्पर्धेला सामोरे जावे लागत आहे. नॅक तसेच विद्यापीठ शैक्षणिक अंकेक्षण अहवालास सामोरे जात असताना ग्रंथपालास विविध समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. एकीकडे विद्यार्थ्यांना प्रभावीपणे सेवा व सुविधा देणे तर दुसरीकडे विविध तपासणी कामासाठी लागणारे दस्ताऐवज तयार करणे हे ग्रंथपालासाठी खुपच आव्हानात्मक आहे. यासोबतच महाविद्यालयीन प्रशासनाने सोपविलेल्या वेगवेगळया प्रकारच्या जबाबदाऱ्या पण स्विकाराव्या लागतात.

किवर्डस :– महाविद्यालय, महाविद्यालयीन ग्रंथालय, ग्रंथपाल

• प्रस्तावना :–

महाविद्यालयीन ग्रंथपाल ग्रंथालयाचे दैनदिन कामकाज करत असतानाच विविध प्रकारच्या तपासणी करण्यासाठीच्या समित्यासाठी लागणारे दस्ताऐवज पण तयार करीत असतो. अशा समित्यांना लागणारे दस्ताऐवज तयार करणे खुपच गरजेचे तसेच अत्यावश्यक काम असते. हे काम करत असताना त्यास विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे. त्यात वाचकांच्या माहिती विषयक गरजा बदलत आहेत. प्रिंट तसेच इलेक्ट्रानिक साहित्याची मागणी व व्यवस्थापन करणे गरजेचे झाले आहे. ग्रंथाच्या तसेच इतर वाचन साहित्याच्या किंमती वेगाने वाढत आहेत. महाविद्यालयीन प्रशासनाकडून म्हणावा तसा पाठिंबा ग्रंथ खरेदीसाठी निधी देण्यात येत नाही. ग्रंथालय संगणकीकरण करत असताना पण अनेक अडचणी येत असतात. या सर्व समस्यांचा अभ्यास या शोधनिबंधात मांडण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

- महाविद्यालय :– उच्चशिक्षण देणारी संस्था[1]
- महाविद्यालयीन **ग्रंथालय** :– महाविद्यालयाच्या शिक्षक व विद्यार्थ्यांना उपयुक्त असे महाविद्यालयाने चालविलेले ग्रंथालय[2]
- ग्रंथपाल :– ग्रंथालयाचा व्यवस्थापक तसेच ग्रंथालयीन सेवा व सुविधेचा प्रसार करणारा जबाबदार व्यक्ति[3]
- आधुनिक काळातील महाविद्यालयीन ग्रंथपालापुढील समस्या :–

सध्याच्या काळात ग्रंथपाल पदावर कार्य करत असलेल्या व्यक्तिस विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे. त्यातील काही प्रमुख समस्या पुढीलप्रमाणे आहेत.

१. माहिती सेवेत होत असलेले बदल :–

सध्या ग्रंथालय सेवेमध्ये फक्त ग्रंथ देवघेव किंवा वाचन साहित्याची देवघेव न होता इतर माहिती सेवाची पण सुरूवात झालेली आहे. यात विविध प्रकारचे डेटाबेस, विविध प्रकारचे अलर्ट अशा प्रकारच्या अनेक सेवाची वाढ होताना दिसत आहे. तंत्रज्ञान पध्दतीत वेगाने बदल होत आहेत. हे बदल स्विकारणे व ते माहिती सेवेत लागू करणे यासाठी जी काही साधने लागतात. ती खुपच महाग असतात. म्हणून माहिती सेवेत होत असलेले बदलहि एक ग्रंथपालापुढील प्रमुख समस्या आहे.

२. इंटरनेट गुगलचे वाढत असलेले महत्व :–

सध्या कोणतीही माहिती शोधायची असेल तर सामान्य वाचक इंटरनेट किंवा गुगल यावर माहिती शोधताना मोठया प्रमाणात दिसून येत आहेत. यावर माहिती उपलब्ध होत असल्यामूळे ग्रंथालयाकडे वाचक येण्याचे प्रमाण कमी होताना दिसत आहे. वाचकांना ग्रंथालयाकडे येण्यापेक्षा इंटरनेट व गुगलवरच माहिती शोधण्यातच जास्त रूची निर्माण होत

असल्याचे दिसून येत आहे. ग्रंथपाल तसेच ग्रंथालयाचेन महत्व या माध्यमापुढे कमी होताना दिसत आहे. म्हणून इंटरनेट व गुगलचे वाढत असलेले महत्वही एक समस्या आपणास दिसून येते.

३. छापील ते अंकीय साहित्य असे होत असलेले वाचन साहित्याचे परिवर्तन :-

आधुनिक काळात वाचन साहित्याचे स्वरूप छापील ते अंकीय साहित्य असे बदलत असलेले आपणास दिसून येते. छापील साहित्य वापरावयाचे प्रमाणात घसरण होत आहे. तर अंकिय साहित्य वापरात विविध कारणाने वाढ दिसून येत आहे. ग्रंथपालापुढे छापील साहित्य कि अंकीय साहित्य घेण्याबाबत समस्या निर्माण होत आहेत. अंकिय साहित्य प्रसारातही अडचणी निर्माण होत आहेत. NLIST सारखे डेटाबेस घ्यायचे तर दरवर्षी त्यांच्या वार्षीक तसेच वाचक ते वापरतील की नाही हि समस्या निर्माण होत आहे. म्हणून छापील ते अंकिय साहित्य असे वाचन साहित्याचे होत असलेले परिवर्तनहि एक समस्या आहे.

४. ग्रंथालय संगणकीकरण :-

ग्रंथालय संगणकीकरण हि सध्याची सर्वात मोठी समस्या असल्याचे आपणास दिसून येते. ग्रंथालय संगणकीकरणासाठी कोणती आज्ञावली वापरावयास पाहिजे. तसेच त्या आज्ञावलीचा खर्च व तांत्रीक सहकार्य आज्ञावलीकर्त्याकडून मिळेल कि नाही याची शाश्वती नसते. तसेच संगणक जर काही कारणाने बंद पडला तर आज्ञावलीतील माहिती नष्ट होण्याची भिती असते. यासाठी संगणक तसेच इंटरनेट सुविधा या चांगल्याप्रकारे ग्रंथालयास आवश्यक असतात. तसेच ग्रंथाची माहिती भरत असताना ग्रंथालयीन कामकाजाकडे पण लक्ष द्यावे लागते म्हणून ग्रंथालय संगणकीकरण करून घेणेहि एक प्रमुख समस्या आहे.

५. संगणकीय साहित्याची देखभाल :-

ग्रंथालयातील संगणकीय साहित्याची देखभाल करणे तसेच ग्रंथालयातील संबधीत बाबी खराब होवू नयेत यासाठी काळजी घ्यावी लागते. संगणकीय साहित्याची वेळोवेळी देखभाल करावी लागते. यात संगणक, प्रिंटर, बारकोड व इतर साहित्य असते. हे साहित्य उत्तम प्रकारे काम करण्यासाठी या साहित्याची देखभाल करणे खुप गरजेचे असते. संगणकीय साहित्याची देखभाल करणे हि एक प्रमुख समस्या असल्याचे आपणास दिसून येते.

६. ग्रंथाच्या व इतर वाचन साहित्याच्या वाढत्या किंमती :-

सध्या ग्रंथ व इतर वाचन साहित्य यांच्या किंमती वाढत आहेत. त्यामूळे ग्रंथ खरेदी, मासीके लावणे, वर्तमानपत्रे लावणे यावरील खर्च गेल्या काही वर्षापेक्षा जास्तच वाढला आहे. क्रमिकग्रंथ खरेदी तर आवश्यक असतेच पण त्याबरोबरच संदर्भग्रंथाची खरेदी पण आवश्यक असते. पण यासाठी आवश्यक निधी मिळण्यामध्ये अडचणी येत असतात. दरवर्षी ठराविक प्रमाणात ग्रंथ खरेदी होणे गरजेचे असते. पण तसे होताना दिसत नाही त्यामागे ग्रंथाच्या व इतर वाचन साहित्याच्या वाढत्या किमतीही एक समस्या दिसून येते.

७. ईबुक्स व डिजीटल कलेक्शन वाढविणे :-

सध्याच्या परिस्थितीत महाविद्यालयीन ग्रंथालय तपासणीसाठी येणाऱ्या विविध समित्याकडून विचारणा होत असते की ईबुक्स व डिजीटल कलेक्शन आहे का व ते वाढविले जात आहे की नाही. ईबुक्स तसेच डिजीटल कलेक्शन विकत घेणे व त्याचा व्यवस्थित वापर करणे हि समस्या आहे. ईबुक्स तसेच डिजीटल कलेक्शन वापरासाठी विद्यार्थी व शिक्षक फारसे उत्सूक असल्याचे दिसून येत नाहीत म्हणून हि एक समस्या आपणास दिसून येत आहे.

८. महाविद्यालय प्रशासनाकडून मिळणारा अपूरा निधी :-

ग्रंथालयासाठी महाविद्यालय प्रशासनाकडून आवश्यक त्या प्रमाणात निधी मिळत नाही. यामूळे विद्यार्थ्यांना आवश्यक त्या प्रमाणात क्रमिक तसेच संदर्भग्रंथाची खरेदी तसेच डिजीटल कलेक्शन वाढविणे तसेच इतर उपक्रमासाठी म्हणावा तशा निधी मिळत नाही. त्यामूळे महाविद्यालयाकडून मिळत असलेल्या अपूऱ्या निधीमूळे ग्रंथालयीन विकासाला खिळ बसते म्हणून हि एक समस्या असल्याचे आपणास दिसून येते.

९. नॅक तसेच विद्यापीठ रँकिग :—

संस्था कोणतीही असो त्याची तपासणी हि कोणत्या कोणत्या संस्थेमार्फत होत असते. महाविद्यालयाची तपासणी नॅक तसेच विद्यीठामार्फत होत असते. या तपासणीसाठी लागत असलेले दस्ताऐवज हे जवळजवळ मागील पाच वर्षापासूनचे लागत असतात. तसेच नॅक आणि विद्यापीठ काय रॅंक देईल, ते ग्रंथालयाचे मुल्यमापन करत असतानाच्या त्रुटीबाबत सकारात्मक विचार करतील की नाही. म्हणून हि एक समस्या ग्रंथपालापूढे दैनदिन काम करत असताना समोर असल्याचे दिसून येते.

- समारोप :—

वरील सर्व समस्या आधूनिक काळातील ग्रंथपालापुढे निर्माण झालेल्या दिसत आहेत. या समस्या सोडविण्यासाठी महाविद्यालयीन प्रशासनाने ग्रंथालयाला जर मदतीचा दृष्टीकोन समोर ठेवला तर ग्रंथालय तसेच ग्रंथपालांना यातून मार्ग काढण्यासाठी नक्कीच मदत मिळेल. महाविद्यालयीन ग्रंथालयासाठी तसेच ग्रंथपालासाठी या समस्या आव्हानात्मक आहेत पण प्रयत्न केले तर यातून सहज मार्ग निघू शकतो. तसेच ग्रंथालय आधुनिकीकरण करण्याच्या दिशेने सुरूवात करता येते.

- संदर्भ :—

१. सातारकर सु. प्र. आणि अघाव उ. रा. (२०१३). ग्रंथालय व माहितीशास्त्र परिभाषाकोश. पुणे, डायमंड पब्लीकेशन्स.
२. सातारकर सु. प्र. आणि अघाव उ. रा. (२०१३). ग्रंथालय व माहितीशास्त्र परिभाषाकोश. पुणे, डायमंड पब्लीकेशन्स.
३. सातारकर सु. प्र. आणि अघाव उ. रा. (२०१३). ग्रंथालय व माहितीशास्त्र परिभाषाकोश. पुणे, डायमंड पब्लीकेशन्स.

-----------------------------*****-----------------------------

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Impact Factor - 6.625

ISSN - 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S


# RESEARCH JOURNEY

**International Multidisciplinary E-Research Journal**

PEER REFREED & INDEXED JOURNAL

February - 2020 Special Issue - 224 (B)

## RELEVANCE OF GANDHIAN THOUGHTS




Guest Editor :
Dr. Mrs. M. V. Waykole
Principal,
Bhusawal Arts, Science and P.O. Nahata
Commerce College, Bhusawal, Dist Jalgaon.

Executive Editor :
Dr. A. D. Goswami
Vice Principal,
Bhusawal Arts, Science and ...
Commerce Co...

Chief Editor :

Principal
Late.Sow.Sheshabai
Sitaram Mundhe Art's College
...khed Dist Parbhani

... Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

RESEARCH JOURNEY

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

'RESEARCH JOURNEY' *International Multidisciplinary E- Research Journal*
Impact Factor - (SJIF) - 6.625,
Special Issue 224 (B) : Relevance of Gandhian Thoughts
Peer Reviewed Journal
ISSN : 2348-7143
February-2020

## INDEX


| No. | Title of the Paper | Author's Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | आज के संदर्भ में गांधी चिंतन की उपादेयता | प्राचार्य डॉ.विश्वास पाटील | 05 |
| 2 | मराठी साहित्य आणि गांधीजी | प्रा.भारती सोनवणे | 10 |
| 3 | महात्मा गांधीजींचे आर्थिक विचार | डॉ. एस.एम.बिराजदार | 15 |
| 4 | महात्मा गांधीजींचे स्त्रीविषयक विचार | डॉ. जयश्री महाजन, कांचन देसले | 20 |
| 5 | आधुनिक परिप्रेक्षातून महात्मा गांधी यांची ग्राम विकासाची संकल्पना | डॉ. जयश्री महाजन, समाधान कुंभार | 24 |
| 6 | महात्मा गांधींच्या सत्याग्रह विचारांची प्रासंगिकता | डॉ.अर्जुन येरगे | 31 |
| 7 | गांधीजींच्या अर्थशास्त्रीय दृष्टिकोनाचे अध्ययन | डॉ. दिनेश गावित | 38 |
| 8 | महात्मा गांधी यांचे शैक्षणिक विचार | प्रा. विनायक तंत्रे | 40 |
| 9 | महात्मा गांधींची सत्याग्रह संकल्पना | डॉ. संगीता शिंदे | 44 |
| 10 | महात्मा गांधींचे आर्थिक विचार | प्रा. गौतम हिंगोले | 48 |
| 11 | महात्मा गांधीचे पत्रलेखन : जनजागृतीचा अभिनय प्रयोग | प्रा. अरुण पाटील | 52 |
| 12 | महात्मा गांधींचे राजकीय विचार : एक अभ्यास | डॉ. दिलीप चव्हाण | 55 |
| 13 | महात्मा गांधींची ग्राम संकल्पना | भैय्यासाहेब देवरे | 58 |
| 14 | महात्मा गांधी यांच्या आर्थिक विचारांचा चिकित्सक अभ्यास | प्रा. लालचंद्र संते | 61 |
| 15 | महात्मा गांधींच्या शैक्षणिक तत्त्वज्ञानाची आजच्या काळासाठी उपयुक्तता | डॉ. सौ. विजया बाविस्कर | 64 |
| 16 | प्राचार्य शिवाजीराव भोसले यांच्या परीप्रेक्षातून गांधीजींच्या 'सर्वोदय' संकल्पनेतील मूलभूत गोष्टी | प्रा. मनोज उत्तमराव पाटील | 68 |
| 17 | महात्मा गांधींच्या विचारांची समर्पकता | श्रीमती एम.व्ही.चौधरी | 72 |
| 18 | महात्मा गांधींचे आर्थिक विचार | डॉ. सुरेश ढाके | 77 |
| 19 | महात्मा गांधींची 'ईश्वर'विषयक संकल्पना | डॉ. सचिन राजपूत | 80 |
| 20 | महात्मा गांधीजींचा सफाई कामगार विषयक दृष्टीकोन | डॉ. ए. डी. गोस्वामी, अमर जावळे | 85 |
| 21 | महात्मा गांधी व ग्रामराज्य संकल्पना | प्रा. सागर बडगे | 87 |
| 22 | महात्मा गांधींचे तत्त्वज्ञान | अधिकराव पाटील | 90 |
| 23 | महात्मा गांधींचे शैक्षणिक तत्त्वज्ञान | श्रीमती सुलक्षणा भरगंडे | 93 |
| 24 | व्यंगचित्रातून (कार्टून्समधून) महात्मा गांधींचे कार्य | दिपक शिरसाट | 98 |
| 25 | गांधीजींच्या विचारातील ग्रामीण अर्थव्यवस्थेत पशुपालन व्यवसाय | डॉ. अकोशगीर गोस्वामी, अमोल बावस्कर | 103 |
| 26 | महात्मा गांधींचे सर्वोदय विषयक विचार | डॉ. एन.एस.बोरसे | 106 |
| 27 | मराठी कादंबरी आणि गांधीवाद | डॉ. रत्ना जवरास | 109 |
| 28 | महात्मा गांधी यांचे स्त्री सशक्तीकरणाबद्दलचे विचार | ज्योती पाटील | 113 |
| 29 | महात्मा गांधींच्या तत्त्वज्ञानातील 'सत्याग्रह' नावाचं अस्त्र | मनोहर शिंदे | 116 |
| 30 | गांधीजींची शिक्षणप्रणालीच खरी जीवनप्रणाली | डॉ. सौ.सुषमा पाटील | 119 |
| 31 | स्वातंत्र्य चळवळीत खानदेशातील महिलांच्या स्वातंत्र्य लढ्याचे प्रणेते : महात्मा गांधी | प्रा.सुभाष धनगर | 121 |
| 32 | महात्मा गांधीचे शैक्षणिक तत्त्वज्ञान | डॉ. साहेब सातपुते | 124 |


Principal
Late.Sow.Shashabai
Sitaram Mundhe A... College
Gangakhed Dist. ...ani

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.625,
Special Issue 224 (B) : Relevance of Gandhian Thoughts
Peer Reviewed Journal
ISSN : 2348-7143
February-2020

# महात्मा गांधीचे शैक्षणिक तत्वज्ञान

प्रा डॉ. साहेब सातपुते,
तत्वज्ञान विभाग प्रमुख,
कै सौ शेपाबाई सीताराम मुंढे कला महाविद्यालय,
गंगाखेड जि परभणी–४३१५१४

विसाव्या शतकातील अत्यंत महत्वाचे व्यक्ती म्हणून महात्मा गांधीचा विचार केला जातो. भारतात आणि जगात गांधीजींचा परिचय निरनिराळ्या क्षेत्रात असलेला दिसतो. गांधीजीच्या विचाराचा मुख्य भर अध्यात्मिकरणावर होता. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात गांधीजीनी सखोल विचार मांडले. धर्म, अर्थकारण, समाजकारण, राजकारण, साहित्य कला आणि शिक्षण या सर्वच क्षेत्रात मौलिक विचार मांडले. महात्मा गांधी दुरदृष्टीचे होते. देश स्वतंत्र झाल्यानंतर देशाला कोणकोणत्या गोष्टीची आवश्यकता भासेल त्या सर्वाच्या त्यांनी विचार केला होता. शिक्षणाच्या संदर्भात तर एक संपूर्ण परिपूर्ण शिक्षण योजना सादर केली. स्वराज्य प्राप्त झाल्यानंतर झेंडा बदलला की शिक्षण बदलले पाहिजे, असे ते म्हणत असत. आज गांधीजीची शैक्षणिक पध्दती प्रत्यक्षात अस्तित्वात नसली तरी त्यांनी सादर केलेल्या योजनेचा स्विकार करुन काही राज्यशिक्षण देण्याचा प्रयत्न केला.

आज अस्तित्वात असलेल्या शिक्षण पध्दतीत अनेक दोष आहेत. अशी टीका सर्वसामान्य व्यक्ती देखील करतो. स्वातंत्र्यपूर्व काळात इंग्रजांनी केवळ कारकून न तयार करणारे शिक्षण दिले आणी तेच शिक्षण आजही चालू आहे. म्हणून स्वातंत्र्यानंतर देशात कोणत्या प्रकारचे शिक्षण दिले पाहिजे? चारित्र्यसंपन्न, स्वावलंबी आणि स्वतंत्र वृत्तीची तरुण पिढी घडवून नवा समाज कसा निर्माण करता येईल, असा प्रश्न त्यांना सतत पडत असे. म्हणून त्या प्रश्नावर सतत चिंतन करत असत. या चिंतनात त्याच्या शिक्षणविषयक विचाराचा उगम आहे. महात्मा गांधीजींच्या मते स्वातंत्र्यपूर्व काळातील शिक्षणामध्ये बदल केला पाहिजे. उपजिविकेचे साधन निर्माण करणारे व्यक्तीच्या सामाजिक नैतिक आणि बौध्दिक गुणाचा विकास करावयाचा असेल तर शिक्षण पध्दतीत आमुलाग्र बदल केला पाहिजे. असे आपण आजही म्हणतो हिच गोष्ट गांधीजीनी पूर्वीच ओळखली आणि नविन शिक्षणविषयक विचार मांडले.

गांधीजीच्या मते केवळ साक्षरता म्हणजे शिक्षण नव्हे किंबहूना शिक्षणाचा प्रारंभही नव्हे "आत्मा आणि मन यांचा परिपूर्ण विकास करुन व्यक्तीमधील सर्वोत्कृष्ट गुणाची अभिव्यक्ती करणे म्हणजे शिक्षण होय." बुध्दि , भावना आणि क्रिया यांच्या विकासावर भर दयावा असे गांधीजी म्हणतात. अध्यात्मिक विकास हे शिक्षणाचे ध्येय असले पाहिजे.

## १) अध्यात्मिक शिक्षण :–

महात्मा गांधी यांनी १९२० साली गुजरात विद्यापीठाची स्थापना करताना उपनिषदातील 'सा विद्या या विमुक्तये' या श्लोकात सांगितलेले शिक्षणाचे उद्दिष्टये त्यांना मान्य होते. या श्लोकाचा खरा अर्थ सांगताना ते म्हणतात, 'विद्या म्हणजे केवळ अध्यात्मिक ज्ञान व मुक्तीचा अर्थ आहे.' मुक्ती किंवा मोक्ष हे वैयक्तिक ध्येय नव्हे तर संपूर्ण मानवतेची मुक्ती म्हणजे मानवतेची सेवा किंवा दरिद्री नारायणाची सेवा हे शिक्षणाचे ध्येय असते, असे गांधीजी प्रतिपादन करतात. म्हणूनच जनसेवा हिच ईश्वरसेवा होय. असे मत गांधीजी मांडतात. अध्यात्मिकता आत्मसाक्षात्कार हे जीवनाचे आणि शिक्षणाचे ध्येय असले पाहिजे असा आग्रह गांधीजी धरतात.

## २) कृती शिक्षण :–

गांधीजी कृती शिक्षणाला महत्व देतात. गाधीजीच्या मते शिक्षणाने बुध्दीविकास होतो. बुध्दीचा विकास केवळ पुस्तकाच्या अभ्यासातून होतो असे नव्हे. खरे बौध्दिक शिक्षण हे कृतीतून होते म्हणजेच आचारणातून होते. आचारणासाठी शरिर आणी इंद्रिय याचा योग्य वापर केला पाहिजे असा आग्रह गांधीजी धरतात. असा हस्त व्यसाय

शिकविणे आवश्यक आहे. ज्यामुळे व्यक्तीला चरितार्थ भागवता येईल. गांधीजी बौध्दिक शिक्षणावरोबर कार्यशिक्षण याला महत्व देतात. ज्ञान आणि कृती एकत्र असावी असा आग्रह गांधीजी धरतात. प्रत्यक्ष कृती आणि अनुभवातून शिक्षण ही त्याची कल्पना व्यक्ती व समाजाला उपयुक्त आहे. आजच्या तरुणांनी तो कोणत्याही शाखेचा असो, त्यांच्या विषयातील ज्ञान प्रत्यक्ष जीवनातील व्यवहार करताना वापरता येत नाही. आपल्या देशातील व समाजातील दारिद्य, अज्ञान आणि शासनाची शिक्षणावर खर्च करण्याची क्षमता लक्षात घेता महात्मा गांधीनी सांगितलेल्या मार्गाने वाटचाल केल्यास शिक्षणाचे देशव्यापी सार्वत्रिकरण सहज शक्य होईल.

३) जीवनोपयोगी शिक्षण :–

शिक्षण हे जीवनोपयोगी असावे शिक्षणातून व्यक्तीच्या मुलभूत गरजा पूर्ण झाल्या पाहिजे. शिक्षणातून व्यक्ती जीवनाविषयक समस्यांना तोंड देण्यास समर्थ बनला पाहिजे. असा आग्रह गांधीजी धरतात. आजच्या सारखेच शिक्षणाचे चित्र गांधीजीच्या काळात गांधीजी समोर निर्माण झाले होते. आजच्या शिक्षणाने लोकांच्या गरजा पूर्ण होतात काय? असे प्रश्न उपस्थित करुन जे शिक्षण जगण्यासाठी कला हस्तगत करुन देत नाही ते शिक्षण काय कामाचे ? शिक्षणात त्या परिसराच्या भौतिक व सामाजिक गरजांचे प्रतिबिंब उमटले पाहिजे. त्यातून दरिद्री, अर्धपोटी, अशिक्षित आणि सुशिक्षित यांना जीवन जगण्यास समर्थ करणारे शिक्षण हेच खरे शिक्षण होय. अध्यात्मिक विकास सर्वांगिण विकास हे शिक्षणाचे परमोच्च ध्येय आहेच पण त्याबरोबर शिक्षण हे जीवनोपयोगी असले पाहिजे असे गांधीजी प्रतिपादन करतात.

४) मुलोद्योगी शिक्षण :–

वर्धा येथे १९३७ साली भरलेल्या अखिल भारतीय राष्ट्रीय परिषदेत गांधीजीनी शैक्षणिक विचार शिक्षण शास्त्रज्ञ व अन्य विचारवंतांना समोर मांडले. गांधीजीच्या विचाराच्या आधारे मुलोद्योगी शिक्षण योजना तयार केली. हे विचार गांधीजीनी लेखी उत्तम शिक्षणाची मुख्य सुत्रे सांगितली आहे.

- शिक्षणामुळे माणूस सुसंकृत व चारित्र्यसंपन्न व्हायला हवा.
- साते ते चौदा वर्षे वयापर्यंतच्या विद्यार्थ्यांना सक्तीचे आणि निशुल्क शिक्षण मिळावे.
- शिक्षणाचे माध्यम मातृभाषेचे असावे.
- केवळ परिक्षावर जोर देणारे पुस्तकी शिक्षण नको.
- एखादा हस्तव्यवसाय शिक्षणाचे केंद्र मानून वॅ विषय शिकाविण्यात यावे.

५) स्वाश्रयी शिक्षण :–

मुलोद्योगी शिक्षण हे स्वाश्रयी शिक्षण आहे. आणि ते व्हावे अशी गांधीजीची अपेक्षा होती. स्वाश्रयी म्हणजे स्वतःचा आश्रय स्वतःच होणे होय. मुलोद्योगी शाळेत मुल ज्या वस्तू तयार करतील त्याची विक्री करुन शिक्षकाचे वेतन व शाळेचा खर्च भागवला जावा असे गांधीजी प्रतिपादन करतात. विद्यार्थी स्वतःच्या शिक्षणाचा खर्च स्वतः भागवू शकतात. शिक्षण संस्थांना देखील निधी उपलब्ध होवू शकतो. शासनावर शिक्षण संस्थांना अनुदान देण्याचा भार पडत नाही.

६) नैतिक व सामाजिक विकास करणारे शिक्षण :–

मुलोद्योगी शिक्षण पध्दतीचा स्विकार करताना गांधीजी विद्यार्थ्यांच्या सामाजिक आणि नैतिक विकासाची दृष्टीकोनही लक्षात घेतलेला आहे. शिक्षणातून सामाजिक बदल झाला पाहिजे. विद्यार्थ्यी आणि शिक्षणसंस्था यांचा समाजाशी सतत संपर्क राहिला पाहिजे म्हणून त्यांनी या योजनेतून निरनिराळे सण, जयंती, पुण्यतिथी, राष्ट्रीय उत्सव, भाषणे, चर्चा वादविवाद, सहली, भेटी, ग्रामसफाई इत्यादी उपक्रमांना महत्वाचे स्थान दिलेले होते. हे कार्यक्रम विद्यार्थ्यांनी स्वतः आयोजित करावे. आणि समाजातील लोकांना सहभागी करुन घ्यावे. या मागचा गांधीजीचा उद्देश

समाजोपयोगी विद्यार्थी निर्माण करणे हे असले पाहिजे ते शिक्षणाकडे सामाजिक क्रांतीचे साधन म्हणून पाहतात. मुलोद्योगी शिक्षण व्यवसाय यांचा जीवनाशी निकटचा संबंध असल्यामुळे ते जगण्यासाठी कमीत कमी गरजा हे जीवनाचे मार्गदर्शन सुत्र म्हणून त्यांनी स्विकारले आणि इतरांनी स्विकारावे अशी अपेक्षा व्यक्त केली. उपभोग प्रधान जीवनपध्दती गांधीजींना मान्य नव्हती. त्यागावर आधारित जीवन पध्दती गांधीजीना मान्य होती. ही जीवनपध्दती मुलद्योगी शिक्षणातून निर्माण होवू शकेल अशी अपेक्षा व्यक्त करतात.

७) चारित्र्याची बांधणी :–

शिक्षणातून विद्यार्थ्यांच्या चारित्र्याची जडण घडण झाली पाहिजे. त्यांच्या चारित्र्याचे संवर्धन झाले पाहिजे म्हणून गांधीजी असे प्रतिपादन करतात कि, “नीती शिक्षणावर भर दिल्याशिवाय आपल्याला सुटका नाही.” नीती शिक्षण, देणे अवघड गोष्ट नाही. चारित्र्य घडविणारे शिक्षण हेच खरे शिक्षण असते. गांधीजीच्या मते विद्यार्थ्यांमध्ये विवेक विकास झाला पाहिजे. त्यांना योग्य–अयोग्य, शुभ–अशुभ, चांगले–वाईट यात भेद करता आला पाहिजे. विवेक शिकवणारे शिक्षण खरे शिक्षण असते.

मुल्यमापन

गांधीजीनी सांगितलेली मुलोद्योगी शिक्षणपध्दती अयशस्वी झाली. यांच्या अयशस्वीतेचे कारणे कोणतीही प्रश्न उपस्थित होतात. गांधीजीने सांगितले शिक्षण पध्दती अस्तित्वात नसली तरीही त्याच्या शैक्षणिक तत्वाचा स्विकार मात्र आज मोठ्या प्रमाणावर केला गेलेला दिसून येतो.

# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

ISSN 2319-8648 | Impact Factor - 7.139 | Indexed (SJIF)

February 2020 Special Issue-22 Vol. 4

# The Role of Women in Global Development

Principal
Late.Sow.Sheshabai
Sitaram Mundhe Art's College
Gangakhed Dist.Parbhani

Chief Editor
Mr. Arun B. Godam

Guest Editor
Principal, Dr.Aqueela Syed Gous

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Special Issue 22 , Vol. 4 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
February 2020 | SJIF | Impact Factor : 7.139

# Index

| | | |
|---|---|---|
| 1. | डॉ.एनी बेसेंट के भारतीय स्वतंत्रता आन्दोलन में योगदान : एक ऐतिहासिक अभ्यास<br>प्रा.राजकुमार ज्ञानोबा चाटे | 1 |
| 2. | अरुणा असफ अली का भारतीय स्वतंत्रता आंदोलन मे योगदान : एक अभ्यास<br>डॉ.रामभाऊ देवराव काशीद | 4 |
| ३. | स्त्री और सामाजिक समस्या<br>डॉ.ललिता राठोड | 6 |
| ४. | प्रशासनिक सुधार<br>प्रा.डॉ. पांडुरंग मुंढे | 8 |
| ५. | पावरलूम उद्योग में मुस्लिम महिला श्रमिकों की भुमिका का अध्ययन<br>( बुरहानपुर जिले के विषेष संदर्भ में )<br>डॉ. राजेष काले | 10 |
| ६. | **भारतीय महिलाओं की सामाजिक स्थिति**<br>**डॉ. हिमालया सुनील सकट** | **14** |
| ७. | पर्यावरण संवर्धनाचे महत्व<br>डॉ. बने रेखा रामनाथ | 16 |
| ८. | विपणनातील आधुनिक प्रवाह<br>प्रा.डॉ.भगवान सांगळे | 18 |
| ९. | जागतीक विकास आणि महिलांचा राजकिय सहभाग<br>प्रा. डॉ. बोरोळे रजनी अनंतराव | 22 |
| 10. | न्यायालयीन सक्रियता<br>चौधरी प्रदीप विनायक | 26 |
| ११. | **यौगिक प्रशिक्षण कार्यक्रमाचा १२ ते १४ वर्ष वयोगटातील जिम्नॅस्टीक खेळाडूंच्या**<br>**लवचिकता व तोल या घटकांवर होणार्या परिणामांचा अभ्यास**<br>प्रा. दिपक प्रकाश सौदागर | 28 |
| १२. | स्त्री आणि पितृसत्ता<br>डिगांबर राधाकीसन जाधवप्रा. , डॉ. गीतांजली भीमराव बोराडे | 31 |
| १३. | स्थुलतेमुळे निर्माण होणारे आजार व उपाय<br>डॉ गौतम रघुनाथ शिंदे , डॉ अंबादास फटांगरे | 34 |
| १४. | ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थेत महिलांचा सहभाग : एक चिकित्सक<br>अध्ययन विशेष संदर्भ : वाशिम जिल्हा<br>सहा.प्रा. ए.टी. वाघ | 38 |
| १५. | 'जागतिक विकासात महिलांची भूमिका – एक अध्ययन'<br>प्रा.डॉ. बालाजी आनंदराव साबळे, | 41 |
| 16. | भारतातील प्रशासकीय सुधारणाची वाटचाल<br>प्रा.डॉ. डी.के. खोकले | 44 |
| १७. | महिलांचा राजकीय सहभाग –एक अध्यन<br>प्रा.दत्तात्रय मुकुंदराव ढवारे | 48 |

Principal
Late.Sow Sheshabai
Sitaram Mundhe Art's College
Gangakhed Dist.Parbhani



74

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Special Issue 22, Vol. 4 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
February 2020 | SJIF | Impact Factor : 7.139

# पर्यावरण संवर्धनाचे महत्व

**डॉ. बने रेखा रामनाथ**

सहायक प्राध्यापिकाए राज्यशास्त्र विभागए कै. सौ. शेषाबाई सीताराम मुंढेए कला महाविद्यालय, गंगाखेड
ता. गंगाखेड जि. परभणी

---

**प्रस्तावना :–**

सजीवाच्या नैसर्गिक परीसरास पर्यावरण असे म्हणतात. वैज्ञानिक कोशानुसार पर्यावरण या संज्ञेत वनस्पती अथवा प्राणी ज्या नैसर्गिक परीसरात जगतात, वाढतात तेथील हवा, जमीन, पाणी व इतर सजीव पर्जन्यमान, उंची तापमान इत्यादी सर्वाचा समावेश होतो.

मराठी विश्वकोशातील व्याख्येनुसार विशिष्ट वेळेचे पर्यावरण म्हणजे शिलावरण, जीवावरण, वातावरण व मुख्य भूवैज्ञानिक घटकातील सतत चालू असणाऱ्या प्रक्रिया व आंतरक्रिया यांचा परिणाम होय.

सजीवांना त्यांच्या जीवनसंघर्षासाठी आणि उत्क्रांतीमध्ये सभोवतालच्या पर्यावरणांशी जुळवून घ्यावे लागते. पृथ्वीवरील सर्वात बुध्दीमान प्राणी मानव हा पर्यावरणाच्या सजीव घटकापैकी एक आहे. त्याने आपल्या बुध्दीमत्तेचा वापर करून आपला विकास साधण्यासाठी पर्यावरणाचा जसा पाहिजे तसा वापर करत गेला. मात्र पर्यावरण जतन करण्याचे साफ विसरला. निसर्गाचा नियमच असा आहे की एखाद्या व्यक्तिकडून वा समाजाकडून जेव्हा आपण मदत घेतो तेव्हा त्याप्रती नेहमी कृतज्ञ राहावे लागते. त्यामूळे त्याच्यात वाढ होते. जसे कुटूंबातील व्यक्ति एकमेंकाना प्रेम लावून प्रेमाची वाढ करतात व घराची जोपासना करतात. तसेच पर्यावरणापासून आपल्याला जीवन मिळते. त्यामूळे त्याचे जतन करणे म्हणजेच स्वतःचे जीवन प्रगल्भ करणे होय.

महाराष्ट्रातील श्रेष्ठ संत तुकाराम महाराज म्हणतात की,

**वृक्षवल्ली आम्हा सोयरे, वनचरे पक्षी ही सुस्वरे आलपिती ।**

खरच वृक्ष हे आपले सगे सोयरे नातलग मित्र परिवारातीलच आहेत. त्यांचे जतन करणे आपले परम कर्तव्य आहे. त्यांचे जतन नाही केले तर आपल्याला जीवनाला पोरक व्हाव लागेल. तेव्हा सदरील शोधनिबंधात पर्यावरणाबाबत मानवी परम कर्तव्याची निकड अभ्यासण्याच्या अनुषंगाने प्रयत्न करण्यात आला आहे.

**संशोधन विषयाचे महत्व :–**

पर्यावरण आणि मानव या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत असे म्हंटले तर वावग ठरणार नाही. पर्यावरण संतुलीत असेल तर मानवी जीवन सुखी समृध्द राहिल. अन्यथा मानवी विनाशाला सामोरे जावे लागेल. आज पर्यावरणीय संतुलन मोठया प्रमाणावर विघडत चालल्याचे दिसून येत आहे. भुप्रदुषण, जलप्रदुषण व वायूप्रदुषणामूळे पर्यावरणाचे संतुलन बिघाड निर्माण होवून मानवाला अनेक आजारांने ग्रासले आहे. पृथ्वीचे सुरक्षा कवच म्हणून आपण ज्याला ओळखतो तो ओझोन वायुच्या पातळीत वेगाने घट होत आहे. त्यामूळे सुर्याची अतिनील किरणे मानवाच्या त्वचेच्या, डोळयाच्या व मेंदुच्या आजाराची वाढ होण्यास कारणीभुत ठरत आहेत. तेव्हा आजच्या परिस्थितीत पर्यावरणीय प्रदुषणाची जाणीव करून घेवून त्यावर वेळीच उपाययोजना करणे आवश्यक आहे असे संशोधकाचे प्रामाणीक मत आहे.

**संशोधन विषयाची उद्दिष्टे :–**

1. पर्यावरणीय प्रदुषणाची माहिती स्पष्ट करणे.
2. पर्यावरणीय प्रदुषण मानवी जीवीताला धोकादायक आहे याची पुरेपूर जाणीव करणे.
3. पर्यावरणीय संतुलनात मानवाच्या अहम भुमिकेचे महत्व जाणणे.

**संशोधन विषयाची गृहितके :–**

1. पर्यावरणाबाबत जाणीव जागृती नाही.
2. पर्यावरण निकोप राहण्यासाठी पुरेसे प्रयत्न होत नाहीत.

**संशोधन पध्दती :–**

प्रस्तुत शोध निबंधासाठी प्रामुख्याने दुय्यम साधन सामुग्रीचा वापर करण्यात आलेला आहे. यात दैनिक वर्तमानपत्रातील लेख, संशोधन मासिके, संदर्भ ग्रंथ व इंटरनेट इत्यादीचा आधार घेण्यात आला आहे. उद्दिष्टे समोर ठेवून सामुग्री संकलीत करून विश्लेषणात्मक पध्दतीचा वापर करून शोध निबंधातील विषय स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

**पर्यावरण प्रदुषणाचे स्वरूप :–**

मानवाच्या बुध्दीमत्तेमुळे आज पृथ्वीवर त्याचे अधिपत्य निर्माण झाले आहे. त्यामूळे तो उन्मत्त होवून पर्यावरणाचे जतन न करता त्याने फक्त स्वतःचा विकास साध्य करण्याचे ठरविले तर झालेला विकास क्षणभंगुर ठरेल. भुजल ही नैसर्गीक संपदा असून पिण्यासाठी, जलसिंचनासाठी, उद्योगधंद्यासाठी नदीपात्राची तसेच जलसाठयाची जलधारण व प्रवाही क्षमता टिकून राहण्यासाठी भुजलाचे मोठे योगदान असते मात्र आज भुजलसाठा हा धोक्यात आला आहे. मानवाच्या हव्यासामूळे वृक्षतोड, समुद्रकिनारा तसेच नदीकिनाऱ्या शेजारील वने, वाळू उपसा यासारख्या हस्तक्षेपामूळे मोठया प्रमाणावर



75

प्रदुषणात वाढ झाली आहे. तसेच खनीज उत्खनन व शेतीत रासायनिक खतांचा वापर वेगवेगळया रासायनिक द्रव्यांचा वापर यामुळे जलप्रदुषणात वाढ होत आहे.

वायुप्रदुषणही मोठया प्रमाणावर वाढत चालले आहे. हवेमध्ये डिझेल या इंधनापासून सल्फर असलेला धुर वातावरणात मिसळतो. यामूळे ओझोन वायुच्या थराला हानी पोहोचून सुर्यापासून निघणारी अतिनिल किरणे पृथ्वीवर नको असताना पोहोचतात. त्याचा परीणाम पर्यावरणाचा ऱ्हास होण्यात होतो आणि जीवनचक्र वेगाने ढासळण्यात सुरूवात होते. हवेतील प्रदुषके शरीरात सुपर ऑक्सिडाईज्ड रेणूची वाढ करतात व शरीरपेशीचा ऱ्हास करतात. त्यामूळे फुफुसाला सुज येते. रक्तवाहिन्याना व ह्रदयाला इजा पोहोचते. वाहतूक प्रदुषणातूंन बाहेर पडणारी अल्ट्राफिनसारखी प्रदुषके रक्तवाहिन्यातील रक्त प्रवाहात अडथळा आणतात. तापमानात वाढ, उष्माघात, त्वचेचे आजार, ह्रदयविकार अशा आजारात वाढ होताना दिसून येते. तापमानातील वाढीचा ध्वनीच्या गतीवर परिणाम होत असतो. तापमानात एक डिग्री सेल्सीयसची वाढ झाली तर ध्वनीचा वेग प्रतिसेंकद सुमारे आठ संटीमिटरने वाढतो.

याशिवाय मृदाप्रदुषणामूळे शेतीला हानीकारक असणाऱ्या रासायनिक साधनांच्या वापरामूळे मृदा प्रदुषण होताना दिसून येते. रासायनिक खतामूळे केमिकलयुक्त अन्न सेवनात भर पडली आहे. त्याचा परिणाम आरोग्यविषयक समस्या मोठया प्रमाणात वाढल्या आहेत.

**पर्यावरण प्रदुषणाचे परिणाम :–**

वरील पर्यावरणीय प्रदुषणामूळे मानवी आरोग्य धोक्यात आले आहे. श्वसनाचे आजार व संसर्गाचे आजार यामध्ये वाढ झाली आहे. डोंळयाचे, त्वचेचे आजार, स्मरणशक्तीला बाधा वाढत आहेत. ओव्हियो स्टेट विद्यापीठाच्या शास्त्रज्ञांनी हवेतील प्रदुषणाने मेंदुतील जडणघडणीत विपरीत परीणाम होवून वैफल्य वाढत चालल्याचे संशोधन करून दाखवून दिले. आज आपण निसर्गाशी जसे वागतो आहोत, तसेच वागत राहिलो तर 2030 सालापर्यंत आपण पॉइट ऑफ नो रिटर्नला पोचू म्हणजे असा टप्पा की जिथून परतीचा मार्ग बंद होईल. आपण ज्या चुका केल्या आहेत त्या सुधरायची संधी आपल्याला मिळणार नाही. कारण तोवर निसर्गातल्या परिसंस्था सुधारता न येण्याजोग्या अवस्थेत पोहोचतील. यासंदर्भात स्वीडनची ग्रेटा थनबर्ग ही 16 वर्षाची मुलगी जाणू शकते आणि जगातल्या सर्व मोठया माणसांना जाब विचारत आहे. तुम्ही मोठी माणस ज्यांच्या हाती भावी पिढीच भविष्य आहे त्याची जोपासना करण्याची जबाबदारी आहे त्यांनी तुमच्या लाडक्या मुलांच्या भविष्यावर दिवसाढवळया दरोडा घालून आपले खिसे भरता आहात हे तुमच्या लक्षात येत आहे का ? असा प्रश्न विचारला. ग्रेटाने जगभरातल्या बडया नेत्यांना व मानवांना धारेवर धरले आहे. तिला पाठिंबा देणारी देशोदेशीची मुले फायडेज फॉर फयुचरचे आंदोलन करीत आहेत. पर्यावरणाच्या रक्षणासाठी तात्काळ उपाययोजना केल्या जाव्यात म्हणून मुलांनी आपआपल्या सरकारांना कोर्टात खेचण्यास सुरूवात केली आहे. श्रीमंत देशातून कर्ब उत्सर्जन जास्त होते. ऑस्ट्रेलिया, अमेरिका, चिन व भारतातील प्रत्येक व्यक्ति दर वर्षाला अनुक्रमे 15.4 टन, 16.5 टन, 7.5 टन व 1.7 टन इतका आहे. यांनी कमीत कमी कर्ब वायू उत्सर्जीत कसा होईल यासाठी आहार, वाहतूक, वीज, शेती व उद्योग यातून तसा बदल केला पाहिजे. फक्त गरज असणाऱ्या छोटया राष्ट्रांनी आवश्यक तेवढा कर्ब उत्सर्ग ठेवावा. या सर्व गोष्टी ग्रेटा सांगत नाही तर तीने याची सुरूवात आपल्या घरापासून केली आहे. वडील एर्नमन थनबर्ग मासांहार करत होते त्यांनी ते करायचे कायमस्वरूपी टाळले. तर आई मलेना थनबर्ग या प्रख्यात ओपेरा गायीका हिने मुलीचे ऐकून कर्ब उत्सर्ग टाळण्यासाठी विमानाने प्रवास करणे सोडून दिले व प्रवासासाठी बस आणि रेल्वेचाच वापर करण्याचे ठरविले.

**पर्यावरणीय संतुलनासाठी मानवी प्रयत्नाची गरज :–**

ग्रेटा सारखेच प्रयत्न प्रत्येक माणसाने करण्याची आज खरी गरज आहे. बोलणारे व नुसता उहापोह करणारे सर्वच आहेत. मात्र गरज आहे अमंलबजावणीची. पर्यावरणाबाबत जागृती व शिक्षण यातून सुजाण नागरिक निर्माण करणे आवश्यक आहे. पर्यावरणाला हानीकारक कृती करणाऱ्यावर कठोर कायदयाचा वापर करून दंडात्मक कारवाई झाली तरच समाजाला शिस्त लागेल व बेजबाबदार वर्तणूकीला आळा बसेल. अशा कायदेशिर अंमलबजावणीमूळे सिंगापूर शहर स्वच्छ झाले. प्लॅस्टिकसारख्या वापरामूळे पर्यावरणाची हानी होते ती टाळून कापडी पिशव्याचा वापर, रासायनिक खताऐवजी सेंद्रिय खताचा वापर अधिकाधिक करून पर्यावरण सुसंवादी पध्दतीने चालले पाहिजे. खनिज तेलाच्या जागी जलविद्युत तसेच सौरउर्जेचा वापर, वाहतुकीसाठी सौर उर्जेवर चालणारी वाहने यामूळे पर्यावरणाचा होणारा ऱ्हास थांबण्यास मदत होईल. पाण्याला जीवन समजून त्याचे जतन करावे लागेल. पाणी अडवा पाणी जीरवा तसेच झाडे लावा या उक्तीप्रमाणे पर्यावरणाचे जतन व संवर्धन झाले पाहिजे. वनस्पतीच्या वाढीसाठी माती अत्यावश्यक आहे म्हणून मृदेचे संवर्धन महत्वाचे आहेच तसेच डोंगर उतारावर झाडे लावल्यामूळे मातीची धुप कमी होते. पाणी झिरपण्याचे प्रमाण वाढते. एकंदरितच प्रत्येकाने आपल्या भावी पिढीसाठी पर्यावरणाची काळजी घेणे हि काळाची गरज आहे.

**संदर्भ :–**

1. पर्यावरण प्रबंधन – मंजू सिंह
2. पर्यावरण प्रदुषण – कुमार प्रदिप
3. पर्यावरण अध्ययन – कुमार अमित
4. पर्यावरण शिक्षा – बा. ना. विना व बा. ना. राजू
5. लोकमत दिवाळी अंक – 2019

Impact Factor – 6.261 Special Issue - 112 Feb. 2019 ISSN – 2348-714

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S


# RESEARCH JOURNEY

UGC Approved Journal

**Multidisciplinary International E-research Journal**

आंतरविद्याशाखीय राज्यस्तरीय चर्चासत्र

# भारताच्या राजकीय व आर्थिक जडणघडणीत महिलांचा सहभाग



- अतिथी संपादक -
प्राचार्य डॉ. अरुण डी. येवले

- मुख्य संपादक -
डॉ. धनराज धनगर

Principal
Late. Sow. Sheshabai
Sitaram Mundhe ... College
Gangakhed Dist. Parbhani

For Details Visit To : www.researchjourney.net

22. भारताच्या आर्थिक विकासात महिलांचे योगदान ........ 67
- प्रा. अजय वासुदेव काटे

23. ज्ञानगंगोत्री सावित्री ........ 69
- प्रा.शिंदे आर.डी.

24. भारतातील राजकीय क्षेत्रात महिलांचा सहभाग ........ 73
- प्रा. रमेश जानकीराम इंगोले

25. सामाजिक चळवळी आणि पर्यावरण संवर्धन क्षेत्रातील महिलांचे योगदान ........ 75
- मोटे भिमराव दत्तु

26. भारतीय महिलांचा राजकाणातील सहभाग ........ 77
- प्रा. विलासराव लवटे

27. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील भारताच्या विविध क्षेत्रात महिलांनी केलेल्या कामगिरीचा ऐतिहासिक अभ्यास ........ 79
- प्रा. गोकूळ निंबा पाटील

28. राजमाता विजयाराजे शिंदे ........ 83
- प्रा. संदीप पगार

29. आभाळी झोका टांगला कविता संग्रहाचा वाङमयीन अभ्यास ........ 84
- प्रा. उन्मेष शेगडे

30. भारताच्या राजकीय, आर्थिक व प्रशासकीय जडणघडणीत महिलांचा सहभाग ........ 86
- प्रा. सुनिता शरद इंगळे, डॉ. आर. व्ही. मस्के

31. भारतीय सामाजिक सुधारणा चळवळीतील–पंडिता रमाबाईचे योगदान ........ 88
- प्रा.भरत केवळ आहेर

32. भारतीय स्त्रीवादी चळवळ ........ 91
- प्रा. श्री. आर. के. सुर्यवंशी

33. भारताच्या महिला परराष्ट्रमंत्री : सुषमा स्वराज ........ 93
- प्रा. दिपक केदारे

34. भारतातील स्त्रीवाद आणि स्त्री मुक्तीच्या चळवळी : एक विश्लेषण ........ 95
- प्रा.कांचन देसले

35. आदिवासी साहित्यातील स्त्रीया ........ 100
- प्रा. शरद तुकाराम आंबेकर

36. शैक्षणिक व सामाजिक चळवळीतील सावित्रीबाई फुले यांचे योगदान ........ 103
प्रा. गावीत यशवंत चेमा, प्रा. डॉ. संजय जिभाऊ पाटील

37. भारताच्या राजकीय जडणघडणीत स्त्रियांची भूमिका ........ 105
- प्रा. औचित्ये बी. सी.

38. सातपुड्यातील संजीवनी ........ 108
- सुनिता बी. पाटील

39. भारतीय स्त्रीवादी साहित्याची जडणघडण ........ 110
- प्रा.स्वप्निल प्रशांत गरूड

40. बचतगटाच्या माध्यमातून महिलांची आर्थिक व व्यावसायिक जडण–घडण ........ 112
- प्रा.सौ.गितांजली सतिष खैरनार

41. महिला बचत गट ग्रामीण विकासाचे साधन ........ 114
- प्रा. भामरे शशिकांत दिवाण

42. भारताच्या राजकीय जडण–घडणीत महिलांचा सहभाग ........ 117
- प्रा. वाघमारे आर. वाय.

43. पंचायत राज व्यवस्थेतील महिला प्रतिनिधीचा राजकीय सहभाग ........ 119
- प्रा. एन. ए. पाटील

44. आंतरराष्ट्रीय राजकारणात शक्तीशाली राष्ट्र म्हणून भारताच्या उभारणीत इंदिरा गांधींचे योगदान (1966 ते 1973) ........ 122
- प्रा. शरद अर्जून वाघ


Principal
Late. Sow. Sheshabai
Sitaram Mundhe Art's College

RESEARCH JOURNEY Internationl Multidisciplinary E-Research Journal ISSN : 2348-7143
Impact Factor (SJIF) - 6.261 | Special Issue 112 : भारताच्या राजकीय व आर्थिक जडण-घडणीत महिलांचा सहभाग February 2019

# भारताच्या राजकीय जडणघडणीत स्त्रियांची भूमिका

– प्रा. औचित्ये बी.सी.
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
कै.सौ.शेषाबाई सीताराम मुंढे
कला महाविद्यालय, गंगाखेड, जि.परभणी.

**प्रस्तावना :**

भारत हा विविधतेने नटलेला देश आहे. भारतात महिलांना पूज्य व देवता समजले जाते. तरी परंतु भारतात पुरुषप्रधान संस्कृती असल्यामुळे स्त्रियांना दुय्यम स्थान दिले गेले. त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन हीन होत गेला. वैदिक काळात गार्गी व मैत्रयी अशा विदुषी होऊन गेल्या मात्र उत्तर वैदिक कालखंडात स्त्रियांचा दर्जा घसरत गेला. मध्ययुगीन काळात रजीया सुलतान, चांदबीबी व राजमाता जिजाऊ सारख्या कर्तबगार महिलांनी आपला ठसा निर्माण केला. स्वातंत्र्यपूर्व काळात महिलांची स्थिती दुय्यम दर्जाची होती. स्त्रियांना कुठलेच अधिकार नव्हते. त्यांचे कार्यक्षेत्र ''चुल व मूल'' इतकेच मर्यादत होते. स्वातंत्र्यानंतर भारताने लोकशाही शासन पद्धतीचा स्वीकार केला. या संविधानाने स्त्री–पुरुष समतेचा स्वीकार केला व राजकीय क्षेत्रात पण महिलांना काही अधिकार प्राप्त झाले. याचाच आधार घेऊन अनेक स्त्रीया राजकारणात व प्रशासनात उच्च पदावर विराजमान झालेल्या आपणास दिसत आहेत. आज भारतात स्थानिक स्वराज्य संस्थांपासून ते विधानसभा, लोकसभा, राज्यसभा या ठिकाणी अनेक महिला निवडून आलेल्या दिसत आहेत. याशिवाय भारतात पंतप्रधान व राष्ट्रपतीपद पण महिलांनी भूषविलेले आपणास दिसते. शिक्षणात प्रशासनात व राजकारणात पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांना दारे मोकळी झाल्यामुळे त्यांच्यात जागृती घडून आली.

भारताच्या राजकीय जडणघडणीमध्ये या स्त्रियांनी मोलाची भूमिका बजावल्याचे दिसते. असे असले तरी स्त्रियांच्या समस्या पूर्णपणे मिटल्या आहेत असे म्हणणे धाडसाचे ठरेल. प्रस्तुत प्रबंधात भारताच्या राजकीय जडणघडणीत महिलांची भूमिका स्वातंत्र्यपूर्व काळातील कर्तबगार महिला, स्वातंत्र्योत्तर काळातील कर्तबगार महिला व त्यांची कामगिरी, राजकारणात स्त्रियांना येणाऱ्या समस्या व त्यावर उपाय यांचा संक्षिप्त आढावा घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**अभ्यास विषयाचे महत्व :–**

जगातील कोणतेही राष्ट्र महिलांच्या सहकार्याशिवाय मोठे होऊ शकत नाही. जगात जे काही शुर व कर्तबगार पुरुष, योद्धे, वीर राजे महाराजे होऊन गेले त्या प्रत्येकाने कोणत्या न कोणत्या स्त्रीच्या पोटीच जन्म घेतला आहे. इतिहासाकडे नजर टाकली तर वैदिक काळात मैत्रयी, गार्गी, महदंबा अशा विदुषी होऊन गेल्या.

मध्ययुगीन काळात रजीया सुलतान सारखी स्त्री दिल्लीच्या गादीवर बसून राज्यकर्ती बनली, याशिवाय राजमाता जिजाऊ यांनी पण छ. शिवाजी महाराजांसारखा राजा घडविला व हिंदवी स्वराज्य प्रत्यक्षात आणले. अहिल्यादेवी होळकर यांनी २८ वर्ष इंदुरचा राज्यकारभार सांभाळला. याशिवाय झाशीची राणी लक्ष्मीबाई यांनी पण पुरुषांस लाजवेल असा पराक्रम केला.

तात्पर्य भारतीय राजकारणात पूर्वीपासूनच कर्तृत्ववान महिलांची कमी नाही. मात्र भारतीय समाजात पुरुषप्रधान संस्कृती असल्यामुळे या सर्वच महिलांना प्रत्येक वेळी अडथळेच आले. त्यामुळे या विषयाचा अभ्यास होणे महत्वाचे वाटते.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :**

१) भारताच्या राजकीय जडणघडणीत महिलांच्या योगदानाचा आढावा घेणे.
२) प्राचीन, मध्ययुगीन तसेच स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील महिलांचे राजकीय योगदान अभ्यासणे.
३) राजकारणात कार्यरत महिलांच्या समस्यांचा अभ्यास करणे.
४) वर्तमान समाजात राजकीय जागृती घडवून आणणे.

**गृहितके :**

१) भारतात पुरुषप्रधान समाजरचना असल्यामुळे स्त्रिया राजकीय क्षेत्रात दुर्लक्षित राहिल्या.
२) भारतीय महिलांमध्ये राजकीय निरक्षरतेचे प्रमाण जास्त आहे.
३) महिलांचा राजकारणात सहभाग वाढला तर राजकारणातील भ्रष्टाचार व इतर गैरप्रकारांना आळा बसू शकेल.
४) स्वातंत्र्योत्तर काळात घटनात्मक तरतुदींमुळे महिलांचा राजकीय सहभाग वाढत आहे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत लेखासाठी ऐतिहासिक व विश्लेषणात्मक पद्धतीचा वापर करण्यात आला. यासाठी प्रामुख्याने दुय्यम साधनांचा वापर करण्यात आला आहे. यात संदर्भ ग्रंथ, क्रमिक पुस्तके, नियतकालिके व वर्तमान पत्रातील लेख यांचा आधार घेण्यात आला आहे.

आता आपण अधुनिक काळात स्वातंत्र्यपूर्व कालखंडात व स्वातंत्र्योत्तर कालखंडात ज्या कर्तबगार महिला तयार झाल्या व ज्यांनी भारताच्या राजकीय जडणघडणीत मोलाची भूमिका बजावली त्याचा धावता आढावा घेऊ.

**स्वातंत्र्यपूर्व काळातील महिलांचे योगदान :**

स्वातंत्र्यपूर्व काळात पण स्त्रियांनी राजकारणात आपला ठसा उमटविलेला दिसतो. भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत पुरुषांप्रमाणेच स्त्रियांचा पण सहभाग मोठा होता. कर्तृत्ववान स्त्रियांची यादी बरीच मोठी आहे. त्यातील काही पुढीलप्रमाणे–

**१) सरोजीनी नायडू :-** स्वातंत्र्यपूर्व काळात सरोजीनी नायडू यांची भूमिका महत्वाची होती. १९२५ साली त्यांची काँग्रेसच्या अध्यक्षपदी निवड झाली होती. तसेच स्वातंत्र्योत्तर काळात पहिली महिला राज्यपाल बनण्याचा मानही त्यांचाच आहे.

**२) कस्तुरबा गांधी :-** कस्तुरबा यांची ओळख आपणास केवळ म. गांधी यांच्या पत्नी अशीच आहे. मात्र स्वातंत्र्य चळवळीत त्यांचा मोठा सहभाग होता. १९४२ चलेजाव आंदोलनात त्यांनी तुरुंगवास सहन केला होता. म.गांधी यांच्या कार्यास त्यांनी नेहमीच आनंदाने पाठींबा दिला होता.

**३)मादाम भिकाजी कामा :-** या मुंबईतील पारशी समाजाच्या होत्या इंग्लंडमध्ये असताना त्यांनी दादाभाई नौरोजी यांच्या सचिव म्हणून काम पाहिले. आपले सर्व आयुष्य भारतभूमीच्या स्वातंत्र्यासाठी खर्च करण्याची त्यांनी शपथ घेतली होती. भारताचा पहिला राष्ट्रध्वज तयार करण्याचा मान त्यांच्याकडे जातो. १९०७ साली जर्मनीतील एका आंतरराष्ट्रीय परिषदेत त्यांनी भारताचा ध्वज फडकवला होता.

**४) ॲनी बेझेंट :-** या एक आयरीश विदुषी होत्या. १८९३ साली त्या भारतात आल्या व भारत हिच आपली माता समजून त्यांनी भारताची सेवा केली. भारतात त्यांनी थिसॉसॉफीकल सोसायटीची स्थापना केली या शिवाय लो. टिळकांसमवेत त्यांनी होमरुल लिगची चळवळ उभारली.

**५) विजयालक्ष्मी पंडित :-** पं. मोतीलाल नेहरु यांच्या कन्या व पं. जवाहरलाल नेहरु यांच्या भगीनी म्हणून विजयालक्ष्मी पंडित ओळखल्या जातात. भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत त्यांचे योगदान मोठे आहे. संयुक्त राष्ट्रसंघाचा आमसभेच्या त्या अध्यक्ष होत्या. संयुक्त राष्ट्रसंघात भारताचे प्रतिनिधीत्व करणारी पहिली भारतीय महिला बनण्याचा मान त्यांच्याकडे आहे.

**स्वातंत्र्योत्तरकाळातील स्त्रियांचे योगदान :**

स्वातंत्र्यपूर्व काळाप्रमाणे स्वातंत्र्योत्तर काळात पण भारताच्या राजकीय जडणघडणीत महिलांनी मोठी भूमिका बजावली आहे. त्यातील काही निवडक महिला पुढीलप्रमाणे–

**१) श्रीमती इंदिरा गांधी :-** पं. नेहरु यांची कन्या इतकीच इंदिरा गांधी यांची ओळख नाही. भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत त्यांनी आपले योगदान दिलेले आहे. भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान बनण्याचा मान त्यांच्याकडे आहे. १९५९ साली त्या काँग्रेसच्या अध्यक्ष झाल्या. लालबहादुर शास्त्री यांच्या निधनानंतर त्या पंतप्रधान बनल्या. १९७१ च्या भारत-पाक युद्धात त्यांनी पाकीस्तानला धूळ चारली बँकाचे राष्ट्रीयकरण, संस्थानीकांचे तनखे रद्द करणे इ. धोरणात्मक निर्णय त्यांनी घेतले. १९७४ साली भारतात राष्ट्रीय आणीबाणी लागू केल्यामुळे त्या टिकेच्या धनी बनल्या.

**२) प्रतिभाताई पाटील :-** भारताच्या पहिला महिला राष्ट्रपती होण्याचा मान प्रतिभाताई पाटील यांचा आहे. १९६२ ते १९८५ या काळात त्या महाराष्ट्र विधानसभेच्या सदस्य होत्या. नंतर त्या देशाच्या राजकारणात सक्रीय झाल्या. १९८६ ते १९८८ या काळात त्या राज्यसभेच्या उपसभापती होत्या व २००७ ते २०१२ या काळात राष्ट्रपती राहिल्या.

**३) विजयाराजे शिंदे :-**या ग्वाल्हेर राजघराण्याच्या राजमाता म्हणून ओळखल्या जातात. त्या महादजी शिंदे यांचा वंशज होत. १९६२ साली त्यांनी काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून राजकारणात प्रवेश केला व नंतर त्यांनी भा.ज.प. मध्ये प्रवेश केला. त्यांचे चिरंजीव माधवराव शिंदे काँग्रेसचे जेष्ठ मंत्री होते. तसेच त्यांच्या कन्या यशोधराराजे शिंदे व वसुंधराराजे शिंदे यांनी पण राजकारणात आपली छाप पाडली आहे.

**४) नजमा हेपतुल्ला :-** या राज्यसभेच्या उपसभापती होत्या. राज्यसभेत कार्य करीत असताना त्यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली. नंतर त्यांनी भा.ज.प. मध्ये प्रवेश केला.

**५) श्रीमती मीरा कुमार :-** या काँग्रेसचे जेष्ठ नेते बाबु जगजीवनराम यांच्या कन्या आहेत. यांनी लोकसभेच्या सभापती म्हणून कार्य केले. त्या दलित समाजातील पहिली महिला सभापती होत.

**६) कु. जयललिता :-** तामिळनाडुच्या मुख्यमंत्री म्हणून कु. एम.जी. रामचंद्रन यांच्या नंतर जयललिता यांनी कार्यभार सांभाळलेला दिसतो.

**७) वसुंधराराजे शिंदे :-** यांनी राजस्थानच्या मुख्यमंत्री म्हणून आपली ओळख निर्माण केली.

**८) सुषमा स्वराज :-** प्रथम दिल्लीच्या मुख्यमंत्री व नंतर भारताच्या विदेशमंत्री म्हणून सुषमा स्वराज या भारतीय राजकारणात आहेत.

**९) श्रीमती सोनीया गांधी :-** इंदिरा गांधी यांच्या स्नुषा व दिवंगत राजीव गांधी यांच्या पत्नी सोनीया गांधी यांनी पतीच्या निधनानंतर राजकारणात प्रवेश केला. भारतातील सर्वात जुना राजकीय पक्ष काँग्रेसच्या अध्यक्षपदाची धुरा त्यांनी यशस्वीपणे सांभाळल्याचे दिसते. जगातील सर्वात शक्तीशाली स्त्रियांमध्ये त्यांचे नाव घेतले जाते.

वरील सर्व यादी पाहिली असता स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात पण भारताच्या राजकीय जडणघडणीत महिलांचा सहभाग मोठा दिसतो.

**राजकारणात कार्यरत स्त्रियांच्या समस्या :**

१) पुरुषप्रधान संस्कृतीमुळे "चूल व मूल" हेच स्त्रीचे कार्यक्षेत्र बनले ते बदलले पाहिजे.

२) स्त्रियांनी राजकारणात सहभाग घेतला व त्या विविध पदांवर निवडून आल्या तरी प्रत्यक्षात कारभार हा त्यांचे पती, मुलगा, अथवा सासरेच पाहतात. उदा. अधुनिक काळात सरपंच पती, नगरसेविका पती ही नवी संकल्पना आज निर्माण झाली आहे.

३) राजकारणात कार्यरत स्त्रियांना निर्णय स्वातंत्र्य मिळत नाही.

४) राजकारणात कार्यरत स्त्रियांकडे पाहण्याचा पुरुषांचा दृष्टिकोन दुषीत असतो.

५) राजकीय क्षेत्रात कार्यरत स्त्री जर अशिक्षीत असेल तर प्रशासनातील पुरुष अधिकाऱ्यांकडून त्यांना हवे तसे सहकार्य मिळत नाही.

६) स्त्रियांमध्ये अज्ञान व निरक्षरता यामुळे त्यांना राजकारणात सक्रीय होण्यासाठी अडथळे निर्माण होतात.

७) भारतातील बहुसंख्य महिला वर्ग मग त्या सुशिक्षीत असो की अशिक्षीत राजकारणाबाबत त्यांचा दृष्टिकोन उदासीन स्वरुपाचा असतो.

**सारांश व निष्कर्ष :**

कोणत्याही राष्ट्राची प्रगती ही नागरिकांच्या राजकीय सहभागावर अवलंबून असते. महिला हा भारतीय लोकसंख्येचा एक महत्वाचा घटक आहे. त्यामुळे भारतातील महिलांची सामाजिक, आर्थिक, राजकीय स्थिती व त्यांचा राजकीय सहभागावर आपल्या देशाची प्रगती अवलंबून आहे असे म्हणता येते.

स्वातंत्र्यपूर्व काळात महिलांचा राजकीय सहभाग हा नगण्य होता, मात्र स्वातंत्र्योत्तर काळात महिलांचा राजकीय सहभाग वाढला आहे. भारतीय राज्यघटनेने पण राजकारणात महिलांचा सहभाग वाढावा यासाठी खास तरतुदी केलेल्या दिसतात. स्वातंत्र्योत्तर काळात भारताने [illegible]ीय शासन पद्धतीचा स्वीकार केला व राजकीय सत्तेचे विकेंद्रीकरण करण्याचा प्रयत्न केला. मात्र केवळ संसदेत बसून जिल्हा, तालुका व गावाचे प्रशासन करणे शक्य नाही ही गोष्ट राज्यकर्त्यांच्या लक्षात आली त्यामुळे पंचायतराज व्यवस्थेचा स्वीकारण करण्यात आला. यासाठी बळवंतराय मेहता समिती, वसंतराव नाईक समिती यांची स्थापना करण्यात आली व यातून पंचायत राज व्यवस्था उभारण्यात आली व त्यात महिलांना विशेष प्राधान्य देण्यात आले. ७३ व्या घटना दुरुस्तीने महिलांना राजकारणात ३३% आरक्षण मिळाले. यामुळे महिला पुरुषांच्या बरोबरीने राजकारणात उतरल्या व भारतीय राजकारणाचा चेहरामोहराच बदलून गेला.

निवडणुकांच्या राजकारणातून उदयास आलेला भ्रष्टाचार, काळा पैसा व गुन्हेगारी प्रवृत्ती यांना आळा घालावयाचा असेल, तर स्त्रियांनी राजकारणात पुढे आलेच पाहिजे. स्वातंत्र्योत्तर काळात स्त्रियांनी राजकारणात पुढे आलेच पाहिजे. स्वातंत्र्योत्तर काळात स्त्रियांनी राजकारणात आपला दबदबा निर्माण केलेला दिसून येत आहे. संयुक्त राष्ट्रसंघात विजयालक्ष्मी पंडित यांनी आपला प्रभाव पाडला, भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी आपले पद शोभायमान केले. भारताच्या पहिल्या महिला राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांनी पण आपली छाप पाडली. भारतात कु. जयललिता, उमा भारती, ममता बॅनर्जी, शीला दिक्षीत, कु. मायावती, वसुंधराराजे शिंदे यांनी मुख्यमंत्री म्हणून आपला प्रभाव पाडलेला दिसतो. आज सोनीया गांधी, सुषमा स्वराज, स्मृती इराणी, लोकसभा अध्यक्षा सुमित्रा महाजन, संरक्षण मंत्री निर्मला सीतारामन या राजकारणात मुक्तपणे वावरत आहेत व आपल्या भूमिका सक्षमपणे पार पाडत आहेत.

एकूणच शेकडो वर्षांच्या द्रास्थातून बाहेर पडू पाहणारी स्त्री स्वातंत्र्योत्तर काळात पंख पसरुन नवनवीन दिशांना उडण्यास सज्ज झाली आहे. आजपर्यंत जे क्षेत्र पुरुषांचे होते त्या क्षेत्रात पाय रोवण्यास तिला काही काळ लागणार आहे. मात्र यात भारतीय महिला यशस्वी होतील.

भारतीयांनी पण आपली पुरुषप्रधान संस्कृती बाजुला सारुन स्त्रियांना प्रोत्साहन दिले तर भारताच्या राजकीय जडणघडणीत महिला अधिक्षक सक्षमपणे आपली भूमिका पार पाडतील व देशाला अजून प्रगतीपथावर नेतील यात शंका नाही.

**संदर्भ सूची :**

१. डॉ. स्वाती कर्वे, ''स्त्री विकासाच्या पाऊलखुणा'', पुणे.
२. डॉ. मंगला आठलेकर, ''स्त्री स्वातंत्र्याची वाटचाल.''
३. संजय खंडारे: पंचायत राज व विकासाच्या योजना.
४. डॉ. आप्पाराव जाधव, भारतीय संविधान आणि राजकारण, श्वेता प्रकाशन, नांदेड.
५. योजना मासिक.
६. दै. लोकसत्ता, दै. लोकमत.